- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया


**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-


# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : रविवार, ६ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २६७ | किंमत : २ रूपये



Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075



सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


# महायुतीत अंतर्गत तणाव ?

**वृत्तसंस्था, मुंबई**

मराठी भाषेच्या अनिवार्यतेवरून सत्ताधारी महायुतीतच मतभेद पाहायला मिळाले. भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस या नियमाच्या बाजूने नव्हते. शिवसेनेचे नेते संजय निरुपम यांनीही या प्रकरणात मवाळ भूमिका घेण्याची विनंती केली होती. काही चालकांनी याविरोधात मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली.

महायुती सरकारमधील शिवसेनेचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ऑटोरिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा शिकणे बंधनकारक केले होते. या नियमानुसार, जो चालक मराठी शिकणार नाही, त्याचे परमिट रद्द केले जाणार होते. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हे लक्षात आले की या नियमामुळे उत्तर भारतीयांमध्ये तीव्र नाराजी पसरत आहे. त्यानंतर त्यांनी सरनाईक यांचा हा निर्णय फिरवला आणि चालकांना मराठी शिकण्यासाठी थेट एका वर्षाची मुदत वाढवून दिली.



परिवहन विभागाने मुंबईतील बिगर मराठी ऑटोरिक्षा आणि टॅक्सी चालकांना १५ ऑगस्टपर्यंत बोलचाल करण्याइतपत मराठी शिकण्याची मुदत दिली होती. चालकांसाठी स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून वर्गांचे आयोजनही करण्यात आले होते. १८ ऑगस्टपासून परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी मराठी न बोलू शकणाऱ्या चालकांवर कारवाई करण्यास सुरुवात केली. जे चालक मराठी बोलू शकले नाहीत, त्यांना एका महिन्यात मराठी शिका, अन्यथा परमिट रद्द केले जाईल अशी ताकीद देणारी नोटीस देण्यात आली. दुसरीकडे, शिवसेना मात्र या नियमाच्या अंमलबजावणीवर ठाम होती. काही उपनगरांमध्ये चालकांनी या नियमाच्या निषेधार्थ वाहने न चालवण्याचा निर्णय घेतला, तेव्हा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) कार्यकर्त्यांशी त्यांचा वाद झाला. त्यामुळे हा संपूर्ण मुद्दा पुन्हा एकदा 'उत्तर भारतीय विरुद्ध मराठी' असा रंगू लागला.

**उत्तर प्रदेशच्या निवडणुका आणि राजकीय गणित**

मुंबईत मोठ्या संख्येने उत्तर प्रदेश आणि बिहारमधील नागरिक राहतात आणि त्यातील अनेक जण आपल्या मूळ राज्यातील मतदारही आहेत. मराठी अनिवार्य करण्याचा निर्णय एकनाथ शिंदे यांच्या पक्षातील मंत्र्याचा असला, तरी मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस हेच सरकारचा मुख्य चेहरा आहेत. या काळात समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी भाजपकडून चालकांवर अन्याय होत असल्याचा आरोप केला. जर भाजपला भाषिक राजकारण करायचे असेल, तर त्यांनी बिगरमराठी मते मागणार नाही असे जाहीर करावे, असे आव्हान त्यांनी दिले.

विरोधी पक्ष या मुद्याचा वापर उत्तर प्रदेशच्या निवडणुकीत आपल्याविरोधात करू शकतात, अशी भीती भाजपा नेतृत्वाला वाटली. याच कारणामुळे देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने हस्तक्षेप करत हा निर्णय मागे घेतला.

### शिंदेंची अडचण आणि अंतर्गत मतभेद

हा निर्णय मागे घेतल्यानंतर उत्तर भारतीयांची नाराजी दूर झाली असे भाजपला वाटत असले, तरी यामुळे राजकारणात एक नवीन वळण आले आहे. या निर्णयामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मोठी अडचण झाली आहे, कारण हा निर्णय त्यांच्याच पक्षाच्या मंत्र्याने घेतला होता. यापूर्वीही शिंदे यांनी घेतलेले काही निर्णय फडणवीस यांनी बदलल्यामुळे शिंदे नाराज असल्याच्या चर्चा महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत.

### थोडक्यात

## आरबीआयचा ५ कंपन्यांना दणका

**नवी दिल्ली:** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं नियमांचं पालन न करणाऱ्या ५ कंपन्यांवर कारवाई केली आहे. आरबीआयनं या कंपन्यांना वेगवेगळ्या कारणांसाठी ४५ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. ट्रान्सयूनियन सिबिल, उपक्रम हाय मार्क क्रेडिट इन्फॉर्मेशन सर्व्हिसेस, इक्विफॅक्स क्रेडिट इन्फॉर्मेशन सर्व्हिसेस, सम्मान फिनसर्व्ह आणि हिंदुजा लेलंड फायनान्स यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. वेगवेगळ्या कंपन्यांनी नियमांकडे दुर्लक्ष केल्यानं ही कारवाई करण्यात आली आहे. आरबीआयनं केलेल्या तपासणीत काही त्रुटी आणि नियमांची पूर्तता न केल्याचं समोर आल्यानं आर्थिक दंड ठोठावण्यात आला आहे. आरबीआयनं जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार ट्रान्सयनियन सिबिल, हाय मार्क आणि इक्विफॅक्स क्रेडिट इन्फॉरमेशन सर्व्हिसेस या तीन कंपन्यांनी तक्रारदारांना निश्चित कालावधीत भरपाई दिली नव्हती. यामुळं आरबीआयनं या कंपन्यांना आर्थिक दंड केला. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या प्रसिद्धीपत्रकानुसार सन्मान फिनसर्व्ह आणि हिंदुजा लेलंड फायनान्स यांच्याकडून क्रेडिट रिपोर्टिंग आणि कर्ज प्रोसेसिंगसंदर्भात चुका झाल्या होत्या. सन्मान फिनसर्व्हनं त्यांच्या एका कर्जदाराशी संबंधित क्रेडिट माहिती सेंट्रल रिपॉझिटरी ऑफ इन्फॉर्मेशन ऑन लार्ज क्रेडिटकडे नोंदवली नव्हती.

# कारची लॉरीला जोरदार धडक, इंजिनिअरिंगच्या आठ विद्यार्थ्यांचा मृत्यू



**वृत्तसंस्था, केरळ**

केरळमधील त्रिशूर जिल्ह्यात शनिवारी एका कारनं उभ्या असलेल्या लॉरीला जोरदार धडक दिल्यानं आठ जणांचा मृत्यू झाला. वृत्तसंस्था पीटीआयच्या माहितीनुसार, मृतांमध्ये तामिळनाडूतील विद्यार्थ्यांचा समावेश असल्याचं समजतंय. त्रिशूर जिल्ह्यातील कैपामंगलम येथे राष्ट्रीय महामार्गावर उभ्या असलेल्या मालवाहू लॉरीच्या मागील बाजूस कार धडकल्यानं आठ जणांचा मृत्यू झाला.

हा अपघात मध्यरात्रीच्या सुमारास पानंबिकुन्नू सेंटर येथे घडला. धडकेमुळं कारचा चक्काचूर झाला. त्यातील प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी गाडी कापावी लागली. प्राथमिक माहितीनुसार, कारमधील प्रवासी हे तामिळनाडूतील दिंडिगुल येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना शुक्रवारी रात्री ११:४२ वाजता घडली. यात तामिळनाडूची नोंदणी असलेली एक कार भरधाव वेगानं जात असताना चालकाचं नियंत्रण सुटलं आणि ती एका लॉरीवर जाऊन आदळली. ही लॉरी राष्ट्रीय महामार्गावरील एका वळणाजवळ उभी होती. ही धडक इतकी भीषण होती की कार पूर्णपणे चक्काचूर झाली आणि तिचा पुढचा भाग पूर्णपणे लॉरीच्या खाली अडकला होता.

**कार कापून मृतदेह काढले बाहेर**

मोठ्या आवाजासह झालेली धडक ऐकून स्थानिक रहिवासी, पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी धावून आले. त्यांनी बचावकार्य सुरू केलं. गाडीतील प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी गाडीचा काही भाग कापावा लागला. अपघाताची भीषणता लक्षात घेता, विशेषतः पुढच्या सीटवर अडकलेल्यांना बाहेर काढणं हे बचाव पथकासाठी अत्यंत आव्हानात्मक काम होतं. गाडीतील सर्व आठही जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**पाच जणांची ओळख पटली**

मृत झालेले सर्वजण तामिळनाडूतील तरुण होते. मृतांपैकी पाच जणांची ओळख पटली असून, त्यात सालेम येथील विश्व, दिंडिगुल येथील सूर्या व युवा संजित आणि मदुराई येथील संतोष व प्रसन्ना यांचा समावेश आहे. उर्वरित तीन प्रवाशांची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# एसटीच्या एनसीएमसी कार्डांचा तुटवडा, रिचार्जच्या तांत्रिक अडचणी

**वृत्तसंस्था, मुंबई**

प्रवाशांच्या सवलतीसारख्या सुविधांसाठी एसटीने सुरू केलेल्या एनसीएमसी कार्डांचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला आहे. अशातच सर्व्हर डाऊन झाल्यामुळे रिचार्जच्या तांत्रिक अडचणींमुळे प्रवाशांचे हाल होत असल्याच्या तक्रारीची भर पडत आहे. एनसीएमसी कार्ड नसल्यामुळे महिला आणि ज्येष्ठांना वाहक तिकीट दरात सवलत देत नसल्याच्याही तक्रारी आहेत.




ऐन गणेशोत्सवात राज्यभर या कार्ड व्यवस्थेचा तांत्रिक गोंधळ उडाल्याने सवलतीचा लाभ घेण्यासाठी पात्र असलेल्या प्रवाशांना पूर्ण तिकीटाचे पैसे मोजावे लागत आहेत. शासनाने ही जाचक अट तातडीने रद्द करावी, अशी मागणी परिवहन मंत्री आणि मुख्य सचिवांकडे करण्यात आली आहे.

सवलतीसाठी पात्र असलेली व्यक्ती स्वतः बसमध्ये उपस्थित असतानाही केवळ कार्ड नसल्यामुळे किंवा कार्ड प्रणालीत तांत्रिक अडथळा आल्यामुळे तिला पूर्ण भाडे आकारले जात असेल, तर सवलत नेमकी प्रवाशासाठी आहे की कार्डासाठी, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

## रामकुंडात स्नानासाठी उतरलेली पाच मुले बुडाली

**नाशिक :** नाशिकमधील रामकुंडात स्नानासाठी उतरलेल्या मुलांपैकी पाच जण बुडाले. स्थानिक नागरिक आणि जीवरक्षक दलाने तातडीने बचाव कार्य हाती घेतल्याने चार मुलांना वाचवण्यात यश आले, तर एका मुलाचा बुडून मृत्यू झाला. मूळचे उत्तर भारतीय असलेले आणि काही वर्षांपासून मुंबईत राहणाऱ्या ४० जणांचा ग्रुप धार्मिक पर्यटनासाठी नाशिकमध्ये आले होते. सकाळी गोदावरी नदीत स्नान करून शिर्डीला साईबाबांच्या दर्शनासाठी जाण्याचा त्यांचा नियोजित कार्यक्रम होता. सकाळी सगळे गोदावरीतील रामकुंडात स्नानासाठी उतरले. त्यांच्यासोबतची मुलेही पाण्यात उतरली. यात पाच मुले बुडायला लागली. लोक आणि जीवरक्षक दलाचे जवान धावले आणि त्यांनी मुलांना वाचवण्याचे प्रयत्न केले. यात चार मुलांना वाचवण्यात यश आले. तर १४ वर्षांच्या गोपाल गुप्ता या मुलाचा बुडून मृत्यू झाला.

## आश्रमशाळेत विद्यार्थिनीचा मृत्यू, ३ कर्मचाऱ्यांना घरचा रस्ता



**वृत्तसंस्था, नाशिक**

आदिवासी वसतिगृह आणि आश्रमशाळांमधील असुविधांवरून राज्यात आंदोलनांची तीव्रता वाढलेली असतानाच नाशिक जिल्ह्यातील विसापूर शासकीय आश्रमशाळेतील इयत्ता दुसरीच्या विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे.श्रुती ओंकार सूर्यवंशी या विद्यार्थिनीच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. दरम्यान, संतप्त पालक आणि आदिवासी युवकांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिल्यानंतर प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करत तीन कर्मचाऱ्यांच्या निलंबनाचे आदेश दिले.

कळवण एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत विसापूर शासकीय आश्रमशाळा येते. श्रुतीला शाळेत असताना ताप आल्याने प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर तिला मोकभगणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचारानंतर प्रकृती सुधारल्याने ती पुन्हा शाळेत आली. मात्र, त्याच रात्री तिची प्रकृती पुन्हा खालावली आणि तिचा मृत्यू झाला.

श्रुतीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी नाशिकच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात आणण्यात आला. या घटनेची माहिती मिळताच पालक आणि आदिवासी युवक मोठ्या संख्येने रुग्णालयात दाखल झाले. श्रुतीच्या मृत्यूस कारणीभूत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करत कारवाई होईपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका पालकांनी घेतली. मृतदेह थेट आदिवासी आयुक्तालयात नेण्याची तयारीही व्यक्त करण्यात आली.

# भारताच्या लेकींचा दणदणीत विजय

**वृत्तसंस्था, मुंबई**

महिला आशिया कप स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान आमने सामने आले होते. मात्र, हरमनप्रीत कौरच्या टीम इंडियापुढं पाकिस्तानचा नभिवा लागला नाही. पाकिस्ताननं टॉस जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, पाकिस्तानची फलंदाजी पत्त्याच्या बंगल्याप्रमाणं कोसळली.




भारताच्या गोलंदाजांनी पाकिस्तानचा डाव ५५ धावांमध्ये गुंडाळला. यानंतर भारताची कर्णधार हरमनप्रीत कौर आणि दीप्ती शर्मा यांनी संयमी खेळी करत विजय मिळवून दिला. हरमनप्रीत कौरनं नाबाद १८ आणि दीप्ती शर्मानं नाबाद १४ धावा करत भारताला विजय मिळवून दिला. भारतानं पाकिस्तानला ७ विकेटनं पराभूत केलं. शफाली वर्मानं १२ धावा केल्या तर पाकिस्तानच्या फातिमा सना हिने ३ विकेट घेतल्या.

महिला आशिया कप स्पर्धेच्या नवव्या सामन्यात भारत आणि पाकिस्तान आमने सामने आले होते. भारत आणि पाकिस्तानच्या सामन्याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं. सामना रोमहर्षक होईल, असा अंदाज होता. मात्र, भारतीय संघानं या सामन्यावर पूर्णपणे वर्चस्व मिळवलं. पाकची कर्णधार फातिमा सना हिनं टॉस जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, १८.१ ओव्हरमध्ये पाकचा संघ ५५ धावांवर बाद झाला. भारताकडून श्री चरणी आणि प्रेमा रावतनं ३-३ विकेट घेतल्या. टी २० क्रिकेटमधील पाकिस्तानची सर्वात कमी धावसंख्या आजच्या सामन्यात नोंदवली गेली.

**पाकची फलंदाजी पत्त्याच्या बंगल्याप्रमाणं कोसळली**

पाकिस्तानसाठी शवाल जुल्फिकार हिनं सर्वाधिक १४ धावांची खेळी केली. यामध्ये तीन चौकारांचा समावेश होता. पाकिस्तानच्या ९ खेळाडूंना दोनं अंकी धावसंख्या देखील गाठता आली नाही. पाकिस्तानची पहिली विकेट २७ धावांवर पडली. त्यानंतर त्यांचा डाव पत्त्याच्या बंगल्याप्रमाणं कोसळला. दुसरी विकेट २८ धावा,तिसरी विकेट २९ धावांवर, चौथी विकेट ३२ धावांवर, पांचवी विकेट ३५ धावा, सहावी विकेट ३५ धावा, सातवी विकेट ४५ धावा, आठवी विकेट ४८ धावा, नववी ५४ धावा आणि दहावी विकेट ५५ धावांवर गेली. पाकिस्तानसाठी मुनीबा आणि शवाल यांनी पहिल्या विकेटसाठी २७ धावांची भागीदारी केली.

यानंतर पाकच्या विकेट धडाधड गेल्या. मुनीबा हिनं १३, आयशा जफरनं २ धावा, सदफ शम्सनं ३ धावा, इमयान फातिमानं ५ धावा, उम्मे हानी हिनं ६ धावा आणि तुबा हसन हिने ९ धावा केल्या. तर, नशरा संधू, सादिया इकबाल, गुल फिरोजा आणि फातिमा सना यांना खातं उघडता आलं नाही.

## नवी मुंबईत दहीहंडी उत्सवाला गालबोट, घणसोलीतील तरुण गोविंदाचा मृत्यू

**वृत्तसंस्था, नवी मुंबई**

नवी मुंबईतील दहीहंडी उत्सवाला गालबोट लागलं आहे. राज्यभरात दहीहंडीचा उत्साह पाहायला मिळतोय. मात्र, नवी मुंबईत एका गोविंदाचा मृत्यू झाला आहे. घणसोली येथील सदानंद नावर या गोविदांचा मृत्यू झाला आहे. दहीहंडी दरम्यान १० थर लावताना तो गोविंदा खाली पडल्याची प्राथमिक माहिती आहे. दहीहंडी उत्सवात आतापर्यंत एमएमआरमध्ये दोन जणांचा मृत्यू झाला आहे.

नवी मुंबई येथील देविदास चौगुले प्रतिष्ठानच्या दहीहंडी कार्यक्रमात दुर्घटना घडली आहे. ऐरोलीत दहीहंडी फोडताना सदानंद नावर जखमी झाला होता. त्याला जवळच्या रुग्णालयात नेण्यात आलं होतं. मात्र, रुग्णालयात पोहोचल्यानंतर उपचारादरम्यान सदानंद नावर वय ३५ याचा मृत्यू झाला आहे. ऐरोलीतील दहीहंडी फोडताना सदानंद नावर हा गोविंदा जखमी झाला होता.जखमी गोविंदाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान जखमी गोविंदाचा मृत्यू झाल्यानं बाल गोपाळांमध्ये शोककळा पसरली आहे. दहीहंडी फोडताना मुंबईच्या मालवणी परिसरात ७ वर्षाच्या गोविंदावर सिमेंट ब्लॉक कोसळून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मालवणी चिकूवाडी परिसरात आज दुपारी ३ च्या सुमारास झोपडपट्टीमध्ये लहान मुलं गल्लीत दहीहंडी खेळत होती. काही मुले स्वतःहून दहीहंडी साजरी करत होती; यासाठी दोरी एका झाडाला आणि तळमजल्यावरील बांधकामाच्या विटांच्या खांबाला (ब्रिक कॉलम) बांधण्यात आली होती. हंडी फोडत असताना विटांचा खांब कोसळला आणि तो ७ वर्षांच्या रुद्र कदम या मुलाच्या डोक्यावर पडल्याने त्याच्या डोक्याला दुखापत झाली. जखमी मुलाला उपचारासाठी त्वरित मालवणी जनरल हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले होते. मात्र, त्याचा मृत्यू झाला. दरम्यान, पुण्यातील सांगवी येथे काल एका महिलेचा डॉल्बीचा लोखंडी सांगाडा डोक्यात पडून मृत्यू झाला होता. म्हणजेच मुंबई, नवी मुंबई आणि पुणे मिळून दहीहंडी उत्सवात ३ जणांचा मृत्यू झाला आहे. तर, दहीहंडी फोडण्याच्या प्रयत्नात अनेक गोविंदा जखमी झाले आहेत. काही गोविंदांवर विविध रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

संपादकीय लेखणीतून...

# मंदी येतेय का?

जागतिक अर्थव्यवस्थेत सध्या मोठ्या घडामोडी घडत असून, अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने कठोर पतधोरणाचे दिलेले संकेत, जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या भडकलेल्या किमती आणि बाँडच्या उत्पन्नात झालेली वाढ यामुळे जागतिक स्तरावर तीव्र अस्थिरता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच देश संभाव्य आर्थिक संकटापासून बचाव करण्यासाठी आपापल्या परीने उपाययोजना आखत आहेत. नेदरलँड्सच्या डच मध्यवर्ती बँकेने अमेरिकेत सुरक्षित ठेवलेला आपला ८६ टन सोन्याचा साठा अचानक ब्रिटनमध्ये हलवल्याने जागतिक अर्थकारणात मोठ्या उलथापालथीची चर्चा सुरू झाली आहे.

जगातील अनेक देशांनी सुरक्षा आणि तांत्रिक सोयीसाठी आपले सोन्याचे राष्ट्रीय साठे अमेरिकेत सुरक्षित ठेवले आहेत. न्यूयॉर्कमधील फेडरल रिझर्व्ह बँकेच्या सुरक्षित भूमिगत तिजोरीत जगातील सर्वात मोठा सोन्याचा साठा जतन करण्यात आला आहे. या अत्यंत सुरक्षित मानल्या जाणाऱ्या तिजोरीत जमा असलेल्या एकूण सोन्यापैकी तब्बल ९८ टक्के सोने हे विविध सरकारे आणि त्यांच्या मध्यवर्ती बँकांचे आहे. २ सप्टेंबर रोजी डच मध्यवर्ती बँकेने या संदर्भात अधिकृत आणि महत्त्वपूर्ण घोषणा केली. उत्तर अमेरिकेत ठेवलेला अब्जावधी डॉलर्स मूल्याचा सोन्याचा साठा बँकेने ब्रिटनमध्ये हस्तांतरित केला आहे. वाढता जागतिक भू-राजकीय तणाव आणि अनिश्चिततेच्या काळात घेतलेल्या या निर्णयाला डच बँकेने संकटकालीन पूर्वतयारी असे संबोधले आहे. हे संपूर्ण हस्तांतरण अत्यंत गुप्ततेने मार्च ते ऑगस्ट दरम्यानच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने पार पाडण्यात आले. न्यूयॉर्क आणि कॅनडातून सोन्याचे हस्तांतरण करण्यात आले आहे. डच मध्यवर्ती बँकेने एकूण ३१३ मेट्रिक टन सोने न्यूयॉर्क आणि कॅनडाची राजधानी ओटावा येथे सुरक्षित ठेवले होते. त्यापैकी ८६ मेट्रिक टन सोने बँकेने सुरक्षिततेच्या कारणास्तव लंडनला हलवले आहे.

या हस्तांतरणापूर्वी, न्यूयॉर्कमधील तिजोरीत नेदरलँड्सच्या एकूण सोन्यापैकी ३१.३ टक्के तर ओटावामध्ये १९.७ टक्के सोन्याचा साठा उपलब्ध होता. मात्र, या ८६ टन सोन्याच्या यशस्वी हस्तांतरणानंतर आता न्यूयॉर्क आणि ओटावा या दोन्ही शहरांमध्ये मिळून डच सोन्याचा साठा केवळ १८.५ टक्क्यांवर आला आहे. अमेरिकेत आणि कॅनडात ठेवलेला आपला सोन्याचा साठा लंडन तसेच नेदरलँड्समध्ये हलवण्याच्या ऐतिहासिक निर्णयावर डच मध्यवर्ती बँकेने अधिकृत स्पष्टीकरण दिले आहे. बँकेच्या या निर्णयामागे आर्थिक सुरक्षितता, लवचिकता आणि बाजारातील व्यापारक्षमता वाढवणे ही मुख्य कारणे असल्याचे सांगण्यात आले आहे. सोन्याचा साठा हलवण्यामागचे मुख्य कारण डच मध्यवर्ती बँकेच्या आकडेवारीनुसार, २०२५च्या अखेरीस बँकेकडे एकूण ६१२.४ मेट्रिक टन सोन्याचा प्रचंड साठा उपलब्ध होता. या साठ्याचे तत्कालीन मूल्य ७२.२ अब्ज युरो (सुमारे ८३.६ अब्ज अमेरिकन डॉलर्स) इतके होते. बँकेच्या गव्हर्नरांनी या हस्तांतरणाचे समर्थन करताना सांगितले की, या निर्णयामुळे आमच्या सोन्याच्या साठ्याची आंतरराष्ट्रीय बाजारातील व्यापारक्षमता आणि वापराची सुलभता अधिक सुधारली आहे. हा सोन्याचा राखीव साठा प्रत्यक्ष वापरण्याची वेळ भविष्यात कधीही येऊ नये अशीच आमची इच्छा आहे.

मात्र जागतिक स्तरावर निर्माण होणाऱ्या कोणत्याही आर्थिक संकटाचा सामना करण्यासाठी आपली तयारी आणि आर्थिक लवचिकता मजबूत ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. डच बँकेने आपला अब्जावधी डॉलर्स मूल्याचा सोन्याचा साठा उत्तर अमेरिकेतून थेट लंडनमध्ये स्थलांतरित केला आहे. बँक ऑफ इंग्लंडमध्ये सुरक्षित ठेवले जाणारे सोने हे आधुनिक आंतरराष्ट्रीय व्यापार मानकांची शंभर टक्के पूर्तता करते. बँक ऑफ इंग्लंडमधील सोन्याचा साठा हा सर्वात सहज, वेगाने आणि विनाअडथळा व्यापार करता येणारा साठा मानला जातो. जर भविष्यात एखादे मोठे आंतरराष्ट्रीय आर्थिक संकट उद्भवले तर डच बँकेला हा सोन्याचा साठा त्वरित आणि अत्यंत सुलभतेने वापरणे अथवा विकणे शक्य होणार आहे. न्यूयॉर्क आणि ओटावा येथील तिजोऱ्यांमध्ये ठेवलेला सोन्याचा साठा संकटकाळात इतक्या वेगाने, सहजासहजी आणि थेट वापरता येत नाही म्हणून डच बँकेने सोन्याचा साठा लंडन येथे हलवण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे, म्हणून जागतिक मंदीची शक्यता वर्तवली जात आहे.

# जागतिक मंदीचे सावट आणि भारतीय अर्थव्यवस्थेची घोडदौड

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

जागतिक पातळीवर आर्थिक अस्थिरता आणि मंदीचे सावट असतानाही, भारतीय अर्थव्यवस्थेने २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत ७.८ टक्के जीडीपी वाढ नोंदवून आपल्या अफाट क्षमतेची जगाला नव्याने ओळख करून दिली आहे. 'मेक इन इंडिया'मुळे वाढलेले देशांतर्गत उत्पादन आणि 'डिजिटल इंडिया'मुळे आलेली पारदर्शकता व गती या दुहेरी इंजिनाच्या जोरावर भारताने थेट परदेशी गुंतवणुकीतही मोठी झेप घेत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याचा मान मिळवला आहे. सक्षम नेतृत्व आणि धोरणात्मक स्थैर्यामुळे देशांतर्गत मागणी मजबूत राहिली असून, जागतिक संकटांचे रूपांतर संधीत करत भारत आज 'विकसित भारता'च्या दिशेने अत्यंत आत्मविश्वासाने आणि खंबीरपणे वाटचाल करत आहे.

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी स्वतः 'एक्स' ट्विटरच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून देशाच्या या ऐतिहासिक आर्थिक कामगिरीची माहिती आणि आनंद जनतेसोबत शेअर केला आहे. जेव्हा जेव्हा देशाची अशी महत्त्वपूर्ण आर्थिक आकडेवारी समोर येते, तेव्हा पंतप्रधानांकडून ती अधिकृतपणे आणि अत्यंत सकारात्मक दृष्टिकोनातून मांडली जाते. पंतप्रधानांच्या या थेट संवादामुळे आणि ट्विटमुळे केवळ देशातील नागरिकांमध्येच नाही, तर जागतिक गुंतवणूकदारांमध्ये आणि शेअर बाजारातही एक अतिशय सकारात्मक आणि आश्वासक संदेश गेला आहे.

सध्याचे जागतिक वास्तव अत्यंत आव्हानात्मक आहे. एका बाजूला भू-राजकीय तणाव, युद्धजन्य परिस्थिती आणि दुसरीकडे विकसित देशांना बसत असलेले आर्थिक मंदीचे चटके, अशा अभूतपूर्व जागतिक अनिश्चिततेच्या काळात भारतीय अर्थव्यवस्था केवळ तग धरूनच उभी नाही, तर ती जागतिक विकासाचे इंजिन बनली आहे. २०२६ च्या या कालखंडात जेव्हा जगातील अनेक बड्या अर्थव्यवस्थांचा विकासदर रेंगाळत आहे, तेव्हा भारताने जपानला मागे टाकत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. हा प्रवास निव्वळ आकडेवारीचा नसून, एका विकसनशील राष्ट्राने जागतिक महासत्तेच्या दिशेने टाकलेले हे अत्यंत आश्वासक पाऊल आहे. भारताच्या या उत्तुंग यशामागे सक्षम राजकीय नेतृत्व, दूरदर्शी आर्थिक धोरणे आणि देशांतर्गत उद्योजकतेची ताकद दडलेली आहे.

भारताच्या या आर्थिक भरारीचा पाया अत्यंत भक्कम आहे, हे नुकत्याच समोर आलेल्या आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीच्या (एप्रिल-जून) आकडेवारीवरून स्पष्ट होते. रिझर्व्ह बँकेचा ७ टक्क्यांचा अंदाज मागे टाकत भारताने तब्बल ७.८ टक्के इतका घसघशीत जीडीपी विकासदर नोंदवला आहे. आयएमएफ , जागतिक बँक आणि ओईसीडी यांसारख्या प्रमुख आंतरराष्ट्रीय संस्थांनी या कामगिरीची दखल घेत स्पष्ट केले आहे की, २०२६ मध्ये जागतिक विकासदर जेमतेम २.५ टक्क्यांच्या आसपास राहील, मात्र भारत ६.४% ते ६.६% दराने वाढून जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून आपले स्थान अबाधित ठेवेल. ही आकडेवारी भारताच्या आर्थिक लवचिकतेची साक्ष देते. जेव्हा चीन आणि युरोपातील देश अनुक्रमे ४% आणि १% च्या आसपास संघर्ष करत आहेत, तेव्हा भारताचा हा वेग खऱ्या अर्थाने लक्षवेधी ठरतो.

या यशाचे सखोल विश्लेषण केल्यास असे लक्षात येते की, हा विकास केवळ एका क्षेत्रावर अवलंबून नसून तो सर्वंकष आहे. भारताच्या सेवा क्षेत्राने १० टक्क्यांची दमदार वाढ नोंदवली आहे, तर 'मेक इन इंडिया' आणि 'प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेंटिव्ह' यांसारख्या धोरणांमुळे उत्पादन क्षेत्राने ९.२ टक्क्यांची लक्षणीय मुसंडी मारली आहे. एकेकाळी मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून असणारा भारत आज स्मार्टफोन, औषधनिर्मिती, संरक्षण साहित्य आणि इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचे जागतिक उत्पादन केंद्र बनत आहे. यामुळे केवळ परकीय चलनाचीच बचत झाली नाही, तर देशांतर्गत पातळीवर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती झाली असून देशांतर्गत भांडवली गुंतवणुकीत ११.९ टक्क्यांची मोठी झेप पाहायला मिळाली आहे.

या उत्पादन क्रांतीला 'डिजिटल इंडिया'ची अत्यंत भक्कम जोड मिळाली आहे. युपीआय आणि डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चरने देशातील तळागाळातील आर्थिक व्यवहारांचे स्वरूपच बदलून टाकले आहे. या डिजिटल क्रांतीमुळे अर्थव्यवस्थेचे मोठ्या प्रमाणावर औपचारिकीकरण झाले, ज्यामुळे पारदर्शकता आली आणि अधिकाधिक व्यवसाय करप्रणालीच्या कक्षेत आले. 'थेट लाभ हस्तांतरण' मुळे सरकारी योजनांमधील गळती थांबून वाचलेला हजारो कोटींचा निधी रस्ते, रेल्वे आणि बंदरांसारख्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी उपलब्ध झाला आहे. व्यवसाय सुलभतेतील या आमूलाग्र बदलामुळेच, संपूर्ण जग आर्थिक अडचणीत असताना, युनायटेड नेशन्स ट्रेड अँड डेव्हलपमेंटच्या ताज्या अहवालानुसार भारतातील थेट परदेशी गुंतवणुकीत तब्बल ४४ टक्क्यांची वाढ होऊन ती ३९ अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. परदेशी गुंतवणूकदारांचा हा ओघ भारताच्या स्थिर आणि पारदर्शक धोरणांवरील विश्वासाचे प्रतीक आहे.

भारताची ही आर्थिक घोडदौड हा कोणताही तात्पुरता फुगा नसून ती अनेक वर्षांच्या संरचनात्मक सुधारणांची फळे आहेत. भक्कम देशांतर्गत मागणीमुळे जागतिक मंदीचा भारताला थेट फटका बसत नाही आणि वाढत्या परकीय चलन साठ्यामुळे बाह्य धक्क्यांपासून संरक्षण मिळते. मजबूत देशांतर्गत बाजारपेठ, राजकीय व धोरणात्मक स्थैर्य, 'मेक इन इंडिया'ची उत्पादन क्षमता आणि 'डिजिटल इंडिया'ची पारदर्शकता या चतुःसूत्रीच्या आधारावर भारतीय अर्थव्यवस्थेने जागतिक संकटांना पचवण्याची एक अभेद्य ढाल तयार केली आहे. 'आत्मनिर्भर भारता'चा संकल्प उराशी बाळगून, जागतिक आव्हानांना संधीमध्ये बदलत नव्या भारताने विकसित राष्ट्राच्या दिशेने अत्यंत आत्मविश्वासाने आणि भक्कमपणे आपली वाटचाल सुरू ठेवली आहे, हेच यातून सिद्ध होते.

– ९५६१५९४३०६

# रोहित शर्माबाबत बीसीसीआयचे धोरण

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**



भारतीय क्रिकेटच्या आधुनिक युगातील सर्वात यशस्वी कर्णधारांपैकी एक असलेल्या रोहित शर्माबाबत बीसीसीआयचे धोरण सध्या अत्यंत सुस्पष्ट, व्यावहारिक आणि भविष्याचा वेध घेणारे दिसते. टी-२० विश्वचषक जिंकून दिल्यानंतर रोहितने क्रिकेटच्या सर्वात लहान फॉरमॅटमधून घेतलेली निवृत्ती आणि त्यानंतर बीसीसीआयने त्याच्याबाबत घेतलेले निर्णय भारतीय क्रिकेटच्या नव्या पर्वाची नांदी ठरतात. रोहित शर्माच्या कारकिर्दीच्या या टप्प्यावर बीसीसीआयची भूमिका मुख्यत्वे कामाचा ताण (वर्कलोड मॅनेजमेंट), मर्यादित षटकांची रणनीती आणि संघ संक्रामण या तीन स्तंभांवर आधारलेली आहे.

**अनुभवाला सर्वोच्च प्राधान्य**

मोठ्या स्पर्धांचे नेतृत्वः बीसीसीआयला रोहितच्या कर्णधारपदाच्या कौशल्याची पूर्ण जाणीव आहे. दबाव हाताळण्याची त्याची क्षमता आणि ड्रेसिंग रूममधील शांत वातावरण राखण्याची हातोटी यामुळेच कसोटी आणि एकदिवसीय (वनडे) क्रिकेटमध्ये रोहितच्या नेतृत्वावर बोर्डाचा पूर्ण विश्वास कायम राहिला.

२०२३ चा वसा पुढे नेणेः २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात आणि २०२४ च्या टी-२० विश्वचषकात रोहितने आघाडीवर राहून ज्या आक्रमक शैलीत फलंदाजी केली, त्या 'अ‍ॅप्रोच'चे बीसीसीआय आणि निवड समितीने उघडपणे समर्थन केले.

**कामाच्या ताणाचे नियोजन**

द्विपक्षीय मालिकांमधून विश्रांतीः रोहितच्या वयाचा आणि तंदुरुस्तीचा विचार करून बीसीसीआयने त्याला छोट्या किंवा तुलनेने कमी महत्त्वाच्या द्विपक्षीय मालिकांमधून विश्रांती देण्याचे धोरण स्वीकारले आहे.

महत्त्वाच्या दौऱ्यांवर भरः रोहित केवळ आयसीसी स्पर्धा आणि ऑस्ट्रेलिया किंवा इंग्लंडविरुद्धच्या महत्त्वाच्या कसोटी मालिकांसाठी पूर्णपणे तंदुरुस्त राहावा, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

**संघाचे सुरळीत संक्रामण**

भावी कर्णधारांची जडणघडणः बीसीसीआयचे स्पष्ट धोरण हे रोहितच्या छायेत नव्या नेतृत्वाची फळी तयार करण्याचे आहे. शुभमन गिल, जसप्रीत बुमराह किंवा हार्दिक पंड्या, सुर्यकुमार यादव, तिलक वर्मा यांसारख्या खेळाडूंना उपकर्णधार - कर्णधारपद किंवा वेगवेगळ्या फॉरमॅटचे नेतृत्व देऊन रोहितच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यासारखी दीर्घकालीन योजना निवड समितीने राबवली.

संवादात्मक पारदर्शकताः अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समिती आणि बीसीसीआय रोहितशी त्याच्या भविष्याबाबत सातत्याने पारदर्शक चर्चा करत आले आहे. खेळाडूवर कोणतीही सक्ती न करता, त्याच्या निर्णयांचा सन्मान करत पुढील पिढीकडे बॅटन सोपवण्याचा हा प्रयत्न आहे.

**२०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकाचा वेध आणि बीसीसीआयची भूमिका**

२०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकातील अंतिम फेरीतील पराभवाची सल आणि त्यानंतर २०२४ चा टी-२० विश्वचषक जिंकून मिळवलेले समाधान या पार्श्वभूमीवर, २०२७ चा एकदिवसीय विश्वचषक (दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया) रोहित शर्मा खेळणार का, हा भारतीय क्रिकेट वतुर्ळातील सर्वात मोठा प्रश्न आहे. बीसीसीआय आणि निवड समितीचे यावरील धोरण सध्या तरी 'वेट अँड वॉच' आणि 'तंदुरुस्तीनुसार मूल्यमापन' या तत्त्वावर आधारलेले आहे.

फॉर्म आणि फिटनेसची अटः २०२७ पर्यंत रोहितचे वय चाळीशीच्या उंबरठ्यावर असेल. बीसीसीआयच्या धोरणानुसार, रोहितची फलंदाजीतील लय, आक्रमक दृष्टिकोन आणि मुख्य म्हणजे त्याची शारीरिक तंदुरुस्ती अबाधित राहिली, तर तो २०२७ चा विश्वचषक खेळण्याच्या शर्यतीत नक्कीच असेल.

अधुरी स्वप्नपूर्तीची प्रेरणाः २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात ज्या निस्वार्थी आणि आक्रमक वृत्तीने त्याने संघाला अंतिम फेरीपर्यंत नेले, ती ट्रॉफी उंचावण्याचे त्याचे स्वप्न अजूनही अपूर्ण आहे. बीसीसीआय त्याच्या अनुभवाचा आदर करत त्याच्यावर निवृत्तीसाठी कोणताही दबाव न आणता, त्याला त्याच्या शरीरानुसार आणि मानसिकतेनुसार निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देत आहे.

**रोहितचे अद्वितीय नेतृत्व गुणः बीसीसीआयचा त्याच्यावरील अढळ विश्वासाचे कारण**

बीसीसीआय रोहितला इतके झुकते माप का देते, याचे मूळ त्याच्या कर्णधारपदाच्या अनोख्या कार्यशैलीत आहे. केवळ मैदानावरील डावपेच नव्हे, तर मैदानाबाहेर खेळाडूंशी असलेला त्याचा संवाद त्याला एक वेगळा नेता बनवतो.

आघाडीवर राहून नेतृत्व : २०२३ च्या विश्वचषकात रोहितने संपूर्ण संघाला 'निडर क्रिकेट' (फिअरलेस क्रिकेट) खेळण्याचा संदेश दिला आणि तो स्वतः पहिल्या षटकापासून अंमलात आणला. वैयक्तिक शतके किंवा विक्रमांचा विचार न करता संघाला आक्रमक सुरुवात करून देण्याची त्याची ही वृत्ती संघात नवा आत्मविश्वास निर्माण करणारी ठरली.

खेळाडूंना सुरक्षिततेची हमी : रोहितच्या नेतृत्वाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तो खेळाडूंना त्यांच्या भूमिकेविषयी पूर्ण स्पष्टता देतो. एखाद्या खेळाडूचे सलग काही सामने वाईट गेले तरी रोहित त्याला लगेच संघातून वगळत नाही, तर त्याला पूर्ण पाठिंबा देतो. खेळाडूंना संघात असुरक्षित वाटू न देणे हीच त्याची खरी ताकद आहे.

शांत डोके आणि 'ह्युमन टच' : मैदानावर अत्यंत तणावाच्या क्षणीही शांत राहून योग्य निर्णय घेण्याची त्याची क्षमता अद्वितीय आहे. याशिवाय, युवा खेळाडूंशी मित्रासारखे बोलणे, प्रसंगी मैदानावर हक्काने ओरडणे आणि मैदानाबाहेर त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारणे, या रोहितच्या सहज-सुंदर वागण्यामुळे संपूर्ण संघ त्याच्या शब्दाखातर मैदानात प्राण पणाला लावण्यासाठी तयार असतो.

बीसीसीआय रोहित शर्माकडे केवळ एक ज्येष्ठ खेळाडू म्हणून पाहत नाही, तर भारतीय क्रिकेटच्या सुवर्णकाळाचा मार्गदर्शक आणि नव्या पवार्चा पाया रचणारा नेता म्हणून पाहते. योग्य सन्मान, नियोजित विश्रांती आणि भविष्याची अचूक सांगड घालणारे हे धोरण भारतीय क्रिकेटला स्थिरता देणारे ठरत आहे.

रोहित शर्माचे नेतृत्व हे केवळ आकड्यांचे आणि रणनीतीचे गणित नाही, तर ते खेळाडूंच्या विश्वासावर आधारलेले आहे. त्यामुळेच २०२७ च्या विश्वचषकापर्यंत रोहितने खेळावे आणि त्याच्या हाती ती मानाची ट्रॉफी यावी, ही केवळ चाहत्यांचीच नव्हे, तर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचीही अंतर्गत इच्छा दिसते.

– ९०९६३७२०८२

# सावधान! हिमालयातील विकासकामांचा अतिरेक देताहेत धोक्याची घंटा

**रमेश लांजेवार**
**नागपूर**

दिनांक २६ ऑगस्ट २०२६ चे नेपाळमधील महातांडव नेपाळला अंधःकारात नेणारे ठरले."ना भुतो ना भविष्यती" अशा प्रकारचा विनाशकारी महाप्रलय जगाने पहाला.यात हजारोंच्या संख्येने जीवीत हाणी झाली असूनही ६ हजारपेक्षा जास्त नागरिक आजही बेपत्ता आहेत व लाखोंच्या संख्येने तेथील लोक बेघर झाले आहेत ही अत्यंत दुःखद आणि अंगावर शहारे येणारी घटना संपूर्ण जगाने आपल्या उघड्या डोळ्यांनी पहाली.तरीही जगातील अनेक देश विकासाच्या नावाखाली हिमालयावर किंवा निसर्गावर वेगवेगळ्या पध्दतीने घणाघाती प्रहार करीत आहेत आणि त्याचेच प्रायश्चित्त आज नेपाळ सारख्या देशाला भोगावे लागत आहेत.हिमालय परिसरातील दिवसेंदिवस महाप्रलयाची चिंता वाढत आहे कारण पाऊस,भूस्खलन, ग्लेशियर वितळणे किंवा भूकंपासारख्या घटना या क्षेत्रात अचानक विनाशकारी महापुराचा धोका वाढु शकतो.

हिमालयाच्या बाबतीत विचार केला तर यांच्या लगतच्या देशांना धोका निर्माण झाला आहे व पुढे चालुन याचे रूपांतर महाविनाशकारी होऊ शकते याचे जिवंत उदाहरण नेपाळच्या रूपात जगाने पाहिले. हिमालयाच्या लगतच्या देशांमध्ये भारत, नेपाळ, चीन(तिबेट परिसर), भूतान तर पूर्णपणे हिमालयीन प्रदेश आहे,पाकिस्तान आणि काही भौगोलिक नोंदीमध्ये अफगाणिस्तान किंवा म्यानमारचा काही सिमावर्ती भाग जोडला जातो.परंतु मुख्यत्वे करून हिमालया लगतचे पाच देश मानले जातात.त्यामुळे हिमालया लगतच्या विकासकामामुळे व जलविद्युत प्रकल्पाच्या उभारणीने या पाचही देशांसाठी महाविनाशाचा आलाराम नेपाळमधून २६ ऑगस्टला झाला आहे. त्यामुळे या पाचही देशांना हिमालयालगतचे विकास कामे ताबडतोब थांबविने किंवा नियंत्रित ठेवणे गरजेचे आहे व हिमनद्यांचे संरक्षण करण्यासाठी तातडीने कठोर पावले उचलण्याची आवश्यकता आहे. मुख्यत्वेकरून चीन हिमालया लगतच्या तिबेट परिसरात एकापाठोपाठ एक नवीन-नवीन जलविद्युत प्रकल्प उभारत आहे. सोबतच रेल्वे,रस्ते वाहतूक उद्देशाने हिमालयालयामध्ये बोगदे तयार करीत असून खनण सुरू आहे. त्यामुळे आजच्या परिस्थितीत हिमालयाला सर्वात जास्त खिळखिळा करण्याचे काम चीन करीत आहे.

त्यांचाच परिणाम आज वॉटर बॉम्बच्या रूपात व महाप्रलयाच्या रूपात नेपाळला भोगावा लागतो आहे. चीनने सध्याच्या परिस्थितीत आपल्या लगतच्या देशांच्या भोवताल मृत्यूची भिंत उभारल्याचे स्पष्ट दिसून येते. स्वतःचे वर्चस्व,स्वतःचा विकास व शेजारच्या राष्ट्रांवर आपली पकड रहावी या उद्देशाने चीन विनाशकारी कार्य निरंतर करीत आहे. जगात वाढती लोकसंख्या, वाढते औद्योगिकीकरण, युद्धजन्य परिस्थिती,जंगलतोड यामुळे हवामानात अवश्य बदल होत आहे आणि याचे प्रायश्चित्त संपूर्ण जग भोगत आहे यात दुमत नाही.परंतु चीन स्वतःच्या स्वाथार्साठी आपल्या शेजारच्या देशांना भयभीत करीत असून मृत्यूच्या खाईत लोटत आहे ही बाब नेपाळमधील नैसर्गिक विनाशकारी महाप्रलयावरून सिद्ध होते.

आज दोन आठवडे उलटुन गेल्यानंतरही हजारो नागरिक अद्यापही बेपत्ता आहेत तरीही शोध मोहीम सुरूच आहे.अशा कठीण घडीला जगातील संपूर्ण देशांनी व संयुक्त राष्ट्रसंघटनेनी सर्वोतोपरी सरळ हातांनी मदत करण्याची गरज आहे. बदलत्या हवामानामुळे जागतिक तापमानवाढ मर्यादा ओलांडल्याने संपूर्ण जगाला याचे गंभीर परिणाम भोगावे लागणार आहेत. नेपाळची भीषण नैसर्गिक आपत्ती ही निसर्गाची फक्त एक झलक आहे. परंतु यापुढे जगात भयानक महाप्रलय, सुनामी, भुकंप, हिमकडा कोसळणे, भूस्खलन, ज्वालामुखीचा उद्रेक अशा भयावह घटना ओढावण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे चीन सारख्या देशाने निसर्गावर अतीरेक करने थांबवावे. आज नेपाळ, भारत, पाकिस्तान, चीन (तिबेट परिसर), भूतान या देशातील हिमालयातील अनेक हिमकडे धोकादायक श्रेणीमध्ये आले आहेत.यामुळेच निसर्गाचे संतुलन दिवसेंदिवस डगमगतांना दिसत आहे. मानवतेच्या अतिरेकामुळे जागतिक तापमानात वाढ झाल्याने पृथ्वीवरील होणारे गंभीर दुष्परिणाम रोखण्याची संधी मानवाने पुर्णतः गमावली आहे. त्याचेच प्रायचित्य नेपाळसह जगातील अनेक देशांना वेगवेगळ्या रूपात भोगावे लागत आहे. तरीही धोकादायक स्थितीत असलेले तापमान सुरक्षित पातळीवर कसे आणता येईल याकडे हवामान शास्त्रज्ञांचे लक्ष लागले आहे.१९ व्या शतकाच्या मध्यातील तापमानाच्या तुलनेत १.५ अंश सेल्सिअस तापमानवाढीचे उद्दिष्ट शास्त्रज्ञांनी सर्वसाधारणपणे स्विकारले होते. परंतु आता २ अंश सेल्सिअस तापमान वाढीमुळे संपूर्ण जीवसृष्टी व पृथ्वी यांच्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात असे शास्त्रज्ञांच्या माध्यमातून सांगितले जात आहे.

यावरून स्पष्ट होते वाढते तापमान, दिवसेंदिवस वाढत असलेली समुद्राची पातळी व वाढत्या तापमानामुळे ग्लेशियर वितळून होणारा महाप्रलय आणि यामुळे निसर्गावर होणारे दुष्परिणाम याचे गंभीर परिणाम पृथ्वीतलावरील प्रत्येक जीवजंतूंना भोगावे लागतील. त्यामुळे जगातील देशांनी वेळ न गमावता ताबडतोब निसर्गाच्या संगोपनाच्या दृष्टीने योग्य पाऊल उचलले पाहिजे. अन्यथा संपूर्ण पृथ्वीचा विनाश अटळ आहे. भारतात हवामान बदलामुळे हिमालयातील हिमनद्या आणि त्यांच्या वितळण्यामुळे तयार होणारी हिमनदी सरोवरे मोठ्या प्रमाणावर धोकादायक स्थितीत आली आहेत. भारताच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने राष्ट्रीय GLOF जोखीम कमी करण्याच्या कार्यक्रमांतर्गत देशातील १९५ हिमनदी सरोवरांना 'अतिसंवेदनशील' आणि 'धोकादायक' म्हणून चिन्हांकित केले आहे. म्हणजे भारताला हिमनद्यांचा (ग्लेशियर वितळण्याचा) धोका केव्हाही उद्भवू शकतो याला नाकारता येत नाही. सध्याच्या परिस्थितीत भारतातील उत्तराखंड, केदारनाथ, झारखंड, ओडिशा, बिहार, उत्तरप्रदेश व इतर भागात जे पावसाचे थैमान व नद्यांच्या पुरांचे वाढते प्रमाण हा सर्वप्रकार ग्लेशियर वितळणे व निसर्गावर होत असलेला अतिरेक यामुळेच देशासह जगात धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत संपूर्ण जग विनाशाच्या उंबरठ्यावर येऊन बसले आहे, यात जगातील युद्धजन्य परिस्थिती, जंगलतोड, वाढते शहरीकरण, औद्योगिक,हिमालय परिसरात जलविद्युत प्रकल्प उभारणी, वाढती लोकसंख्या यामुळे आकाश-पाताळ, स्थल, जल, वायू यांना मोठा धोका निर्माण झाला आहे त्याचे प्रायश्चित्त मानवजातीसह संपूर्ण सृष्टीला भोगावे लागणार आहे.

– ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# बल्लारपुरात पहिले जिल्हा आरोग्य साहित्य संमेलन

## ९ सप्टेंबरला आयोजन, डॉ. अभय बंग यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य, व्यसनमुक्ती आणि ग्रामविकासावर मंथन

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**
आरोग्य हा केवळ उपचाराचा विषय न राहता तो सामाजिक जाणीव, साहित्य आणि लोकसहभागाशी जोडला जावा, या उद्देशाने बल्लारपुरात राज्यातील अभिनव प्रयोग म्हणून पहिले जिल्हा आरोग्य साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. पंचायत समिती आणि फिनिक्स साहित्य व सांस्कृतिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियानांतर्गत ९ सप्टेंबर रोजी गोंडराजे बल्लाळशहा नाट्यगृहात हे संमेलन होणार आहे. प्रसिद्ध समाजसेवक व साहित्यिक डॉ. अभय बंग यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या संमेलनात आरोग्यविषयक विविध प्रश्नांवर साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांकडून मंथन केले जाणार आहे.

बंग 'आरोग्य स्वराज्य' या संकल्पनेवर विशेष भाष्य करणार आहेत. गावपातळीवर आरोग्याबाबत जनजागृती निर्माण करण्याबरोबरच नागरिकांनी स्वतःच्या आणि समाजाच्या आरोग्याची जबाबदारी स्वीकारावी, या दृष्टिकोनातून संमेलनातील चर्चांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार असून गटविकास अधिकारी धनंजय साळवे स्वागताध्यक्ष आहेत. नगराध्यक्षा डॉ. अल्का वाढई, तहसीलदार रेणुका कोकाटे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटरे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आशा साळवे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

संमेलनाची सुरुवात सकाळी ग्रंथदिंडीने होणार आहे. त्यानंतर आरोग्यातून ग्रामनिर्माण : नागरिक, साहित्यिकांची जबाबदारी या विषयावर परिसंवाद होईल. डॉ. अर्जुन पावरा यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या परिसंवादात आदर्श गाव राजगडचे चंदू पाटील मारकवार आणि डॉ. प्रविण येरमे सहभागी होणार आहेत. दुपारी १.३० वाजता निमंत्रितांचे कविसंमेलन होणार असून कवयित्री अर्जुनमवानो शेख अध्यक्षस्थानी राहणार आहेत. कवी प्रदीप देशमुख आणि सुधाकर कन्नाके प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

दुपारी ३ वाजता ह्यलढाई व्यसनमुक्तीची : घरापासून समाजापर्यंतह्ल या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. सामाजिक कार्यकर्त्या अॅड पारोमिता गोस्वामी अध्यक्षस्थानी राहणार असून मानसोपचार तज्ज्ञ डॉ. विवेक बांबोडे आणि सोमनाथ व्यसनमुक्ती प्रकल्पाच्या डॉ. हेमलता पानगंटीवार सहभागी

### आरोग्याच्या प्रश्नांना साहित्याची जोड

होणार आहेत. व्यसनाच्या वाढत्या समस्येवर कुटुंब, समाज आणि प्रशासनाची भूमिका यावेळी चर्चिली जाणार आहे.
सायंकाळी डॉ. अभय बंग यांच्या अध्यक्षतेखाली समारोपीय सत्र होईल. सामाजिक कार्यकर्ते बंडू धोत्रे, लेखक राजेश मडावी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिव्याख्याता डॉ. शारदा येरेमे आणि स्वागताध्यक्ष धनंजय साळवे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. फिनिक्स साहित्य व सांस्कृतिक प्रतिष्ठानचे सचिव विजय वाटेकर यावेळी संमेलनात ठराव मांडणार आहेत. आरोग्य आणि साहित्याच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाला चालना देण्याचा हा उपक्रम असून, साहित्यिक, आरोग्य विभागातील अधिकारी-कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन गटविकास अधिकारी धनंजय साळवे यांनी केले आहे.

थोडक्यात

## भिवापूर महाविद्यालयाच्या प्राचार्यांना सुवर्ण पदक



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातर्फे उत्कृष्ट प्राचार्य म्हणून भिवापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जॉबी जॉर्ज यांची 'डॉ. आर. कृष्णकुमार सुवर्ण पदका'साठी निवड करण्यात आली. शिक्षक दिनानिमित्त शनिवारी (५ सप्टेंबर) नागपूर येथील गुरुनानक भवन येथे झालेल्या समारंभात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती अनिल स. किलोर यांच्या हस्ते त्यांना सपत्नीक सुवर्ण पदक प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली शीरसागर होत्या. प्र-कुलगुरू डॉ. अखिलेश पेशवे यांचीही प्रमुख उपस्थिती होती.
शैक्षणिक विकास, प्रभावी प्रशासकीय नेतृत्व, विद्यार्थीकेंद्री उपक्रम आणि महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत डॉ. जॉर्ज यांना हा सन्मान देण्यात आला. त्यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाने शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली आहे. या सन्मानाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा सौ. सुमनताई मुळक, सचिव राजेंद्र मुळक, कोषाध्यक्ष यशराज मुळक यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी डॉ. जॉर्ज यांचे अभिनंदन केले.

## शिक्षकदिनी सर्व शिक्षकांनी एकजुटीच्या संकल्प करा: मुख्याध्यापक वासुदेव भुते

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
आजच्या परिस्थितीत शिक्षकीपेक्षा म्हणून काम करणं खूप कठीण आहे. अपेक्षाच एवढं ओझं आहे की त्या अपेक्षाचं ओझं



वाहत असतानी शिक्षक कधीतरी खचत असतो, तरीसुद्धा दिलेले काम न डगमगता, काम करत असताना सर्वांकडून सहन करण्याची क्षमता असलेल्या शिक्षकांना मानाचा मुजरा. आजची परिस्थिती बघता ऑनलाइन, ऑफलाइन काम करत असताना कितीही काम असले तरी विद्यार्थ्यांसमोर आनंदात हसत खेळत दहा ते पाच मध्ये काम करीत असताना चेहऱ्यावर मात्र दुःख दिसू देत नाही. शिक्षकांची संख्या कमी होत आहे. शिक्षक सेवानिवृत्त होत आहे, तरीसुद्धा व्यवस्थित वगार्चे नियोजन करून आपल्या विद्यार्थ्यांना अभ्यासात मागे नाही राहिले पाहीजे म्हणून शिक्षक नेहमी काळजी घेत असतात. आजच्या कालावधीत शिक्षणा व्यतिरिक्त जनगणना, निवडणूक, बीएलओ, एसआयआर, निरक्षर,विविध उपक्रमाचा भडीमार होत असताना आमचे शिक्षक, पालकांशी व्यवस्थित संबंध ठेवून गाव पातळीवरील, पदाधिकारी,अधिकारी यांना विश्वासात घेऊन काम करणाऱ्या शिक्षकावर एवढे मोठे बंधन असताना सुद्धा हसत खेळत ज्ञानाचं ज्ञानार्जन करणाऱ्या व विद्यार्थ्यांना ज्ञान देणाऱ्या शिक्षक अभिमानास्पद पात्र आहे. प्रत्यक्ष शाळेत गेल्यानंतर विद्यार्थ्यांचे चित्र डोळ्यासमोर दिसल्यानंतर विद्याथार्ना कामी लावल्यानंतर सुद्धा आपल्या ऑफिसमधील काम, मुख्याध्यापकाची जबाबदारी, लिपिकाची जबाबदारी, चपराशी यांची सुद्धा जबाबदारी, स्वयंपाक झाल्यानंतर पहिली चव घेणाची जबाबदारी अशा एक ना अनेक जबाबदाऱ्या शिक्षक सांभाळत असतात. शिक्षकांची जबाबदारी खूप मोठी आहे, शिक्षकांना त्यांची जाणीव सुद्धा माहित आहे.
आजच्या परिस्थितीचे चित्र मनाला खुप यातना देतात तरीसुद्धा शिक्षक डगमगत नाही, ठामपणे उभा राहतो असे सर्व गुणसंपन्न शिक्षक कौतुकास पात्र आहे. ज्या देशात शिक्षकांचे प्रश्न राहत नाही तो देश निश्चित प्रमाणात सुजलाम सुफलाम आणि एक आदर्श देश म्हणून गणल्या जाते. सर्व शिक्षकांनी आपल्या पेशाबद्दल आदर राखावा आणि सर्वांनी संघटित होऊन शिक्षकांनी एकत्र येणे गरजेचे आहे. शिक्षकांनी एकत्र आले तर निश्चित प्रमाणात आपल्या सर्व मागण्या मान्य झाल्याशिवाय राहणार नाही . संघटन शक्तीमध्ये ताकद आहे. त्यामुळे आज शिक्षक दिनी सर्व शिक्षकांनी एकजुटीचा संकल्प करावा, असे आव्हान आज दहेगाव येथील पीएम श्री उच्च प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक वासुदेव भुते यांनी ज्ञानार्जनाचे प्रामाणिक काम करणाऱ्या सर्व शिक्षकांना केले आहे.

## जनता विद्यालय मौदा येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा, विद्यार्थ्यांनी सांभाळली शाळेची धुरा

**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**
जनता विद्यालय मौदा येथे ४ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकांबद्दलचा आपला आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक अनिल मेश्राम होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्याध्यापक श्री. तांबडे सर, ज्येष्ठ शिक्षिका परसतवार मॅडम आणि पंकज पिसे सर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली.



**विद्यार्थ्यांनी घेतल्या तासिका आणि व्यक्त केले मनोगत**
या शिक्षक दिनाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी स्वतः शिक्षकांची भूमिका साकारली. शाळेतील वरिष्ठ वर्गाच्या विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भूमिका अत्यंत जबाबदारीने पार पाडल्या. विद्यार्थ्यांनी वर्गात जाऊन वेगवेगळ्या विषयांच्या तासिका घेतल्या आणि अध्यापनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. याप्रसंगी आयोजित मुख्य कार्यक्रमात वैदेही निखाडे आणि समीक्षा मुधाळे व इतर विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करत शिक्षकांचे जीवनातील महत्त्व सांगणारे सुंदर मनोगत व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट आणि बहारदार संचालन माही बारापात्रे या विद्यार्थिनीने केले. तर आभार प्रदर्शन अंजली फालके या विद्यार्थिनींनी केले.
या प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या लाडक्या शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करत सर्व शिक्षकांचा गौरव केला. विद्यार्थ्यांचे हे प्रेम पाहून शिक्षकही भारावून गेले होते. या सुवर्णक्षणाचे औचित्य साधून शाळेतील सर्व शिक्षकांतर्फे विद्यार्थ्यांसाठी विशेष अल्पोपहाराची (नाश्ता) व्यवस्था करण्यात आली होती, ज्याचा सर्व विद्यार्थ्यांनी आनंद घेतला. मान्यवरांचे मार्गदर्शन भाषणात उप मुख्याध्यापक श्री तांबडे सर यांनी विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली.
ते म्हणाले की, शिक्षकी पेशा हा केवळ एक व्यवसाय नसून समाज घडवण्याचे मोठे माध्यम आहे. विद्यार्थ्यांनी आज घेतलेला अनुभव त्यांना भविष्यात एक चांगला नागरिक बनण्यास मदत करेल. प्रमुख पाहुण्यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षक दिनाचे महत्त्व पटवून दिले. शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या मोठ्या उपस्थितीत हा सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

## चाचेर येथील पीएमश्री शाळेत शिक्षक दिन उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
पीएमश्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा चाचेर येथे भारताचे माजी राष्ट्रपती, महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगणारी भाषणे, कविता, गीत व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांबद्दल व्यक्त केलेल्या भावना आणि शुभेच्छांमुळे कार्यक्रमाला विशेष भावनिक व आनंददायी वातावरण लाभले.
यावेळी मार्गदर्शन करताना शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांचे स्थान, शिक्षणाचे महत्त्व आणि विद्यार्थ्यांनी चांगले संस्कार आत्मसात करून जबाबदार नागरिक बनण्याची गरज याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जीवन यशवंत सहारे, मुख्याध्यापक अनिल गडपायले, शिक्षक रवींद्र घुगे, भारती साखरकर, कु. परवीन शेख,प्रीती खंगार, शिल्पा उकुडे, नेहा निमजे, रुचिला खंडाईत, संगीता बालकोटे तसेच शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उत्साह, आनंद आणि शिक्षकांप्रती कृतज्ञतेच्या भावनेत हा शिक्षक दिन सोहळा संपन्न झाला.

## शेतकरी संघर्स कृति समिती काटोलच्या, शाखा पारडसिंगाच्या अध्यक्षपदी दिपंकर गायकवाड यांची निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**
नुकतीच पारडसिंगा येथे उमेश वाघमारे यांच्या निवासस्थानी शेतकरी संघर्ष कृती समिती काटोल जिल्हा नागपूर, महा. राज्या तर्फे महाराष्ट्र राज्य तर्फे पारडसिंगा येथे समितीच्या शाखेची स्थापना करण्यात आली यावेळी समाजसेवक सुभाषजी नोरोलिया,अध्यक्ष बाबारावजी वाघमारे,सचिव पप्रफुल्लदादा जोशी, उपाध्यक्ष सेवानिवृत्त प्रा. रमेश येवले, सहसचिव हरिष मानकर, सुवर्णा पवार, रामरावजी पाटील,व नगरसेविका लताताई कडू, सि. शाखा अध्यक्ष



सुनीताताई काळे, मयूर काळे, संगीता भामकर यांच्यातर्फे पदधिकाऱ्यांना नियुक्त्या देण्यात आल्या.
प्रशान्त ढोले सचिवपदी, सिद्धार्थ सोमकुवर सहसचिव पदी, अखलाख शेख कोष्याध्यक्षपदी, तर प्रवीण येवले, प्रविणाताई वरोकर, रुपालीताई खोब्रागडे, संध्याताई नागोसे, शिलाताई निस्वादे,या सर्वांचीच उपाध्यक्षपदी तर उमेश वाघमारे यांची कार्याध्यक्ष इतर शेतकरी उपस्थितात श्रीकांत गौरखेडे, अक्षय कडुकर, समीर डोंगरे, उदय पवार यासर्वांनीच पदधिकाऱ्यांची एकमताने निवड केली.
या सर्व नियुक्त्या घेतलेल्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन व त्यांना पुढील सामाजिक शेतकरी व संघटनात्मक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या सर्वांनीच आपल्या संबोधनात शेतकरी हा जगाचा अन्नदाता आहे. शेतकरी जगला तरच जग जगेल? सर्वच पदधिकाऱ्यांनी नियुक्ती बद्दल समितीचे आभार मानले व निवड ही सार्थक ठरविन्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन करुणा येवले यांनी केले संचालणं प्रा. येवले यांनी केले. यावेळी शेतकऱ्याची मोठया प्रमाणात उपस्थिती होती

## पी. जैन अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. कंपनीतील कामगारांच्या परिवारावर उपासमारीची वेळ

### कामगाराचे थकीत वेतन देण्यास कंपनीची टाळाटाळ, डी.पी. जैन कंपनीच्या १०० ते १५० कामगारांचे ४ ते ५ महिन्यांचे वेतन थकीत, कामगारांची पोलिसांत धाव



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**
पालोरा परिसरात रस्ते बांधकामाचे काम करणाऱ्या डी.पी. जैन अँड कंपनी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. कंपनीतील सुमारे १०० ते १५० रोजंदारी कामगारांचे मागील ४ ते ५ महिन्यांचे वेतन थकीत असल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. यासंदर्भात कामगारांनी पारशिवनी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार देत आपल्या थकीत वेतनाचा प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी केली आहे. कामगारांच्या म्हणण्यानुसार, त्यांना दरमहा साधारण १५ ते ३५ हजार रुपये वेतन मिळते. मात्र गेल्या चार-पाच महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने अनेक कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांसमोर उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण, घरभाडे, कर्जाचे हप्ते तसेच दैनंदिन खचार्चा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. कामगारांनी आपल्या तक्रारीत आपण कोणताही वाद किंवा हिंसाचार करू इच्छित नसून, केवळ आपल्या मेहनतीचा मोबदला मागत असल्याचे नमूद केले आहे. तसेच कंपनीच्या साइटवरील सुरक्षा कर्मचाऱ्यांना हटविण्यात आल्याने भविष्यात काही अनुचित प्रकार घडण्याची शक्यता असल्याची चिंताही त्यांनी व्यक्त केली आहे.
कामगारांनी पोलिसांकडे तक्रार दाखल करून तक्रारीची नोंद घेणे, प्रकरणाची तातडीने चौकशी करणे, उपस्थिती व वेतनासंदभार्तील नोंदी तपासणे, प्रत्येक कामगाराचे थकीत वेतन मिळवून देण्यासाठी कार्यवाही करणे आणि केलेल्या कारवाईची माहिती लेखी स्वरूपात देणे, अशा मागण्या केल्या आहेत. दरम्यान, थकीत वेतनाचा प्रश्न मार्गी न लागल्यास चक्काजाम, धरना व आंदोलन करण्यास मजबूर होऊ, असा इशाराही कामगारांनी निवेदनातून दिला आहे. आता पोलिसांकडून या तक्रारीची काय दखल घेतली जाते आणि कामगारांच्या थकीत वेतनाचा प्रश्न कधी मार्गी लागतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बल्लारपूर तालुक्यात ग्रामपंचायत आरक्षणाचा बिगुल; विसापूर खुले, बामणी (दु.)ला ओबीसी महिला

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-(धनंजय पांढरे )**
आगामी ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बल्लारपूर तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत शुक्रवारी बल्लारपूर येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात पार पडली. तहसीलदार रेणुका कोकाटे आणि नायब तहसीलदार विनोद निखाते यांच्या उपस्थितीत झालेल्या या आरक्षण सोडतीकडे तालुक्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते.
आगामी ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीनंतर पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठी सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या १२ ऑगस्ट २०२६ रोजीच्या राजपत्रातील तरतुदीनुसार ही आरक्षण सोडत घेण्यात आली.
तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींसाठी झालेल्या सोडतीनंतर सर्वाधिक मोठ्या ग्रामपंचायतींपैकी एक असलेल्या विसापूरचे सरपंचपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी निश्चित झाले आहे.



सोडतीत अनुसूचित जमाती प्रवगार्साठी चार, अनुसूचित जाती प्रवगार्साठी तीन, नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी एक, तर सर्वसाधारण प्रवर्गासाठी नऊ सरपंचपदे निश्चित करण्यात आली. यामध्ये नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी केवळ एकच आरक्षण असून, ते बामणी (दु.) ग्रामपंचायतीसाठी ओबीसी महिला प्रवर्गात जाहीर झाले.
अनुसूचित जमाती प्रवगार्साठी लावारी आणि मानोरा ग्रामपंचायतींचे सरपंचपद महिलांसाठी राखीव करण्यात आले आहे. तर हडस्ती आणि आमडी ग्रामपंचायतींमध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील सर्वसाधारण राखीव करण्यात आले आहे. तर दहेली ग्रामपंचायतीचे सरपंचपद अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवारासाठी निश्चित करण्यात आले आहे.
सर्वसाधारण प्रवर्गासाठी नऊ ग्रामपंचायतींचे सरपंचपद निश्चित करण्यात आले. यामध्ये विसापूर, कळमना, नांदगाव (पोडे), कोठारी आणि किन्ही ग्रामपंचायतींचे सरपंचपद सर्वसाधारण प्रवर्गातील पुरुषांसाठी राखीव झाले आहे. तर पळसगाव, कवडजई, काटवली (बामणी) आणि कोर्टीमक्ता ग्रामपंचायतींचे सरपंचपद सर्वसाधारण महिला प्रवगार्साठी निश्चित करण्यात आले आहे.
आरक्षण सोडतीच्या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य, माजी पंचायत समिती सदस्य, तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. आरक्षण जाहीर होताच इच्छुक उमेदवारांच्या हालचालींना वेग येण्याची शक्यता असून, आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलण्यास सुरुवात झाली आहे.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : रविवार, ६ सप्टेंबर २०२६

थोडक्यात

## वैज्ञानिकतेसह आध्यात्मिक विचार सांभाळणारे विद्यार्थी देशात निर्माण करणे शिक्षकांची जबाबदारी: मुख्याध्यापक विकास धारगावे

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

शाळा व शिक्षक हे देश व नागरिक घडविणारे मंदिर व कोहिनूर हिरे आहेत. देशासाठी सोनियाच्या चिडियांना तयार करण्याचे



कार्य शिक्षक करतात. भारतीय समाजाच्या विकासात शिक्षकाची भूमिका अग्रगण्य असून कोणताही राष्ट्र किंवा सभ्य समाज शिक्षकाविना प्रगती करू शकत नाही. देशास प्रगतीपथावर आरुढ करण्यास्तव वैज्ञानिक, अध्यात्मिक गुणसंपन्न शिक्षकांची गरज आहे. शिक्षक हा भारतीय समाजाच्या सर्वात मोठा देवता असून ब्रह्मा ,विष्णू महेश या त्रिशक्ती पेक्षाही महान आहे. वैज्ञानिकतेसह आध्यात्मिक विचार सांभाळणारे विद्यार्थी देशात निर्माण हे शिक्षकांची जबाबदारी असून, असे विद्यार्थी निर्माण करण्याचा प्रयत्न मी मागील २६ वर्षापासून करीत असून, प्रत्येक शिक्षकाने असे विद्यार्थी निर्माण करावे असे आव्हान आज शिक्षकदिनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा घोटमुंढरी येथील मुख्याध्यापक विकास धारगावे यांनी ज्ञानार्दजनाचे प्रामाणिक कामे करणाऱ्या शिक्षकांना केले आहे.

## लोधी समाजाच्या एकजुटीचे दर्शन घडविणारे महाअधिवेशन नागपुरात

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

लोधी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय विकासाला नवी दिशा देण्यासाठी रविवार ला ६ सप्टेंबर रोजी नागपुरातील रेशीमबाग परिसरातील कवीवर्य सुरेशभट सभागृहात भव्य लोधी समाज महाअधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. अखिल भारतीय लोधी, लोध, राजपूत कल्याण महासभा तसेच समाजातील विविध संघटनांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या या अधिवेशनाला महामंडलेश्वर श्री साक्षी महाराज स्वामी श्रीकंठनंद व राजवीर सिंग (राजू भैय्या) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. महाअधिवेशनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीयमंत्री नितीनजी गडकरी, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच राष्ट्रीय मागास आयोगाच्या अध्यक्षा साध्वी निरंजन ज्योती यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनात लोधी समाजासमोरील सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय प्रश्नांवर विचारमंथन करण्यात येणार असून, युवक व महिलांचा सहभाग वाढविणे, शिक्षण-रोजगाराच्या संधी, समाजातील संघटनात्मक एकजूट आणि समाजहिताच्या विविध विषयांवर चर्चा होणार आहे.

महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतून समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याने हे महाअधिवेशन लोधी समाजाच्या एकजुटीचे आणि संघटनात्मक शक्तीचे प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे. अखिल भारतीय लोधी राजपूत कल्याण महासभेचे राष्ट्रीय मंत्री राम खरपुरिया लोधी यांनी समाजबांधवांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाअधिवेशन यशस्वी करावे, असे आवाहन केले आहे.

## कारगावच्या शाळेत शिक्षक दिनासह गोपालकाला उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

तालुक्यातील कारगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत शिक्षक दिन आणि गोपालकाला उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांत सहभागी होत आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले. शिक्षक दिनानिमित्त शाळेत विद्यार्थ्यांचे स्वयंशासन घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील विविध जबाबदाऱ्या सांभाळत शिस्त, नेतृत्व आणि जबाबदारीचा अनुभव घेतला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

गोपालकालेनिमित्त दहीहंडीचा कार्यक्रम घेण्यात आला. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी राधा-कृष्णाची वेशभूषा करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. चिमुकल्यांच्या निरागस अभिनयाने आणि उत्साहाने शाळेचा परिसर आनंदमय झाला. कार्यक्रमाला मुख्याध्यापिका सौ. निलिमा पाटणे, पदवीधर शिक्षक बंडू वैद्य, सहाय्यक शिक्षिका मंजू माने, इंदिरा धुळेवार यांच्यासह शिक्षकवृंद व इतर मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने कार्यक्रमाची सांगता उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

## विश्रांती कॉन्व्हेंट स्कूल निमखेडा येथे जन्माष्टमी मोठ्या उत्साहात साजरी




**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

विश्रांती कॉन्व्हेंट स्कूलमध्ये जन्माष्टमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. भगवान श्रीकृष्ण आणि राधा यांच्या वेशात आलेल्या विद्यार्थ्यांनी सर्वांना मंत्रमुग्ध केले. मटकी फोडण्याचा कार्यक्रम हे प्रमुख आकर्षण होते. याप्रसंगी प्राचार्य शांता खांडेकर, बिंदू तागिरिसा आणि रक्षक खांडेकर यांनी भगवान श्रीकृष्णांच्या जीवनावर आणि शिकवणीवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांना प्रसाद वाटण्यात आला.

# मनपा शाळांमध्ये यंदा विद्यार्थिसंख्येत वाढ

### शिक्षण समितीच्या प्रयत्नांना सकारात्मक यश



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या स्टँडिंग कमिटी हॉलमध्ये महानगरपालिका शिक्षण समितीची महत्त्वपूर्ण बैठक शिक्षण सभापती संतोषदेवी दीपक लड्ढा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत मनपा शाळांमधील शिक्षण व्यवस्था अधिक गुणवत्तापूर्ण, सुविधायुक्त आणि विद्यार्थीकेंद्रित करण्यासह विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**अनेक वर्षांनंतर मनपा शाळांच्या विद्यार्थी संख्येत वाढ**

बैठकीत यावर्षी महानगरपालिका शाळांच्या विद्यार्थी संख्येत झालेल्या वाढीबद्दल विशेष समाधान व्यक्त करण्यात आले. मागील अनेक वर्षांपासून मनपा शाळांमधील विद्यार्थी संख्या सातत्याने कमी होत होती. अशा परिस्थितीत यंदा विद्यार्थी संख्येत झालेली वाढ ही शिक्षण समिती आणि शिक्षण विभागासाठी महत्त्वपूर्ण सकारात्मक उपलब्धी मानण्यात आली.

मार्च महिन्यात शिक्षण समितीची स्थापना झाल्यानंतर शिक्षण सभापती संतोष देवी दीपक लड्ढा यांनी मनपा शाळांच्या मुख्याध्यापक व प्रमुख शिक्षकांसोबत सातत्याने बैठका घेऊन विद्यार्थ्यांची संख्या वाढविणे, शाळांच्या समस्या समजून घेणे तसेच पालकांचा मनपा शाळांवरील विश्वास वाढविण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले.

शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या प्रयत्नांचाही यंदा सकारात्मक परिणाम दिसून आला. या यशाबद्दल बैठकीत सर्व मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करण्यात आले.

**विद्यार्थ्यांच्या सुविधांवर विशेष भर**

बैठकीत विद्यार्थ्यांना अधिक चांगले व सुविधायुक्त शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी शालेय स्टेशनरी, बेंचेस तसेच दुसरा गणवेश यांच्या वितरणासंदर्भात चर्चा करण्यात आली. पहिला गणवेश विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आला असून, दुसऱ्या गणवेशाचे वितरणही नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाहीबाबत विचारविनिमय करण्यात आला. शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी आवश्यक व पुरेशा संख्येने बेंचेस तसेच इतर मूलभूत शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यावरही विशेष भर देण्यात आला, जेणेकरून विद्यार्थ्यांना सुविधायुक्त व चांगल्या वातावरणात शिक्षण घेता येईल. यासोबतच महानगरपालिकेद्वारे चालविण्यात येणाऱ्या २१ सेमी-इंग्लिश शाळांच्या कार्यवाही व प्रगतीचाही आढावा घेण्यात आला. एका महाविद्यालयाच्या प्रस्तावावरही चर्चा करण्यात आली असून, संबंधित कार्यवाहीला गती देऊन विद्यार्थ्यांच्या हितासाठी हा प्रस्ताव लवकरात लवकर पुढे नेण्यावर भर देण्यात आला.

**विद्यार्थ्यांचा पर्यावरण संवर्धनात सक्रिय सहभाग**

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती वाढविण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेच्या एका मोठ्या शाळेच्या माध्यमातून व्यापक वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

**विद्यार्थी संख्येतील वाढ हा पालकांच्या वाढत्या विश्वासाचा संकेत : शिक्षण सभापती**

शिक्षण सभापती संतोष देवी दीपक लड्ढा यांनी सांगितले, विद्यार्थी संख्येत झालेली वाढ हा केवळ एक आकडा नसून मनपा शाळांवरील पालक आणि विद्यार्थ्यांचा वाढता विश्वास दर्शविणारा महत्त्वपूर्ण संकेत आहे. मनपा शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे हा आमचा उद्देश आहे. येणाऱ्या काळात मनपा शाळा या पालकांची पहिली पसंती ठराव्यात, यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत आहोत.

बैठकीस शिक्षण समितीचे सदस्य तसेच उपायुक्त डॉ. मेघा वासनकर, शिक्षण अधिकारी अमित भदाणे, उपशिक्षण अधिकारी सीमा खुबरागडे, सुभाष उपासे, विनय बघले, रोकडे, तायडे, ग्रंथालय विभागाचे भुजाडे यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## महादुला शहराची भाजपची सर्व आघाड्या स्थापन

### विकास सर्वस्तरातून व्हावा यादृष्टीने संघटनात्मक पाऊल

### संकेत बावनकुळे, अजय बोढारे, नागपूर यांची प्रमुख उपस्थितीत पद वाटप सोहळा संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

महादुला शहरातील संघटनात्मक कामे तातडीने व्हावी आणि जनसामान्यांचे प्रश्न तातडीने सुटावेत या उदात्त हेतूने भाजपाच्या सर्व आघाडी च्या प्रमुख, उपाध्यक्ष, महामंत्री, असे पद् वाटप कार्यक्रम शनिवार ला सकाळी ११वाजता महादुला नगराध्यक्ष सौ. हेमलता मनोज सावजी (ठाकूर) यांच्या लोणखैरी फाटा नांदा कोराडी येथे संपन्न झाला.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती संकेतदादा बावनकुळे भाजपयुमो महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य यांच्यासह नागपूर जिल्ह्याचे नेते, महामंत्री अजय बोंडारे एस आय आर प्रमुख कामठी विधानसभा तसेच विशेष आमंत्रित म्हणून हेमलता मनोज सावजी, नगराध्यक्ष नगरपंचायत महादुला, उपाध्यक्ष वैशाली पवन पखिड्डे, भाजप गटनेते अभिजित ढेंगरे, सर्व सभापती नगरसेवक, नगरसेविका याप्रसंगी उपस्थित होते.

भाजपा महादुला शहर कार्यकारिणी सचिन पाटील, अध्यक्ष, भाजपा, सोमनाथ चपडिया-महामंत्री, महादेव शाहू-महामंत्री, विश्वनाथ चव्हाण-महामंत्री, अजय शाहु-महामंत्री, संदीप पटले-उपाध्यक्ष, रवींद्र मेश्राम-सदस्य, नाना लांडे-सदस्य, तर शहर भाजप युवा मोर्चा कार्यकारिणीत अमोल कुथे -अध्यक्ष, शैलेश गजघाते-महामंत्री, आशिष कुशराम-महामंत्री, नितीन (ठाकूर) सावजी -महामंत्री, सुमित धनेकर-महामंत्री, प्रल्हाद वैद्य-उपाध्यक्ष, मनोज पवार-उपाध्यक्ष, भाजपा महादुला शहर अनुसूचित जाती आघाडी राहुल नागदेवे-अध्यक्ष, अखिलेश मेश्राम-महामंत्री, गौतम रंगारी-महामंत्री निखिल मेश्राम-महामंत्री, अमित गोंडान-महामंत्री, बापुराव सोनवणे-उपाध्यक्ष, संदीप कुरील, स्नेहल मेश्राम-सदस्य, महिला आघाडीत ट्विंकल पखिड्डे-अध्यक्षा, वर्षा अंजनकर-महामंत्री, निकिता गोडबोले (लोणारे) महामंत्री, आरती पोफळघाट-महामंत्री, शिल्पा बोरसरे-महामंत्री, पौर्णिमा भिलावे-महामंत्री, सीमा कठाडे-उपाध्यक्ष, मेघा वसुले-उपाध्यक्ष, महादुला शहर अल्पसंख्यांक आघाडी शोएब शब्बीर शेख-अध्यक्ष, इर्शाद खान-महामंत्री, तालीब शेख-महामंत्री, यासीन शेख-उपाध्यक्ष, फारुख शेख-महामंत्री यांचा समावेश आहे.

## वर्धा-बल्लारशाह पॅसेंजरच्या वेळेत बदल : चंद्रपूरकडे येणाऱ्यांना दिलासा, मात्र विद्यार्थ्यांची गैरसोय

### वर्धा येथून आता सकाळी ६.३० ऐवजी ७.३० वाजता सुटणार; ५ सप्टेंबरपासून सुधारित वेळ लागू

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने प्रवाशांच्या सुविधेसाठी ट्रेन क्रमांक ६११२७ वर्धा-बल्लारशाह दैनिक मेमूच्या वेळेत बदल केला आहे. यापुढे ही गाडी वर्धा जंक्शनवरून सकाळी ६.३० ऐवजी ७.३० वाजता सुटणार आहे. सुधारित वेळापत्रकाची अंमलबजावणी ५ सप्टेंबर २०२६ पासून करण्यात आली आहे.

वर्धा येथे १२२८९ मुंबई-नागपूर दुरंतो एक्स्प्रेस सकाळी ६.५७ वाजता, तर १२१०५ मुंबई-नागपूर विदर्भ एक्स्प्रेस सकाळी ७.१२ वाजता पोहोचते. त्यानंतर ७.३० वाजता वर्धा-बल्लारशाह मेमू सुटणार असल्याने या गाड्यांनी वर्ध्यापर्यंत येऊन पुढे चंद्रपूरकडे जाणाऱ्या प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार वर्धा जंक्शनवरून गाडी सकाळी ७.३० वाजता सुटेल. हिंगणघाट येथे ८.१७ वाजता आगमन व ८.३२ वाजता प्रस्थान, वरोरा येथे ९.१२/९.१३, माजरी जंक्शन येथे ९.२६/९.२७, तर चंद्रपूर येथे १०.२६ वाजता आगमन व १०.२८ वाजता प्रस्थान होईल. बल्लारशाह येथे गाडी सकाळी ११.०५ वाजता पोहोचेल. या गाडीला चितोड़ा, भुगांव, सोनेगांव, वाघोली, येनोर, नागरी, चिकणी रोड, भांदक, ताडाली, छोटी पडोली, विवेकानंद नगर, बाबूपेठ, गोंडवाना-विसापूर यासह सर्व निर्धारित स्थानकांवर थांबा राहणार आहे.



**विद्यार्थ्यांसह नोकरदारांची मात्र गैरसोय**

दरम्यान, वरोरा, माजरी, भांदक आदी स्थानकांवरून चंद्रपूर येथे शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तसेच नोकरी आणि व्यवसायानिमित्त दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी ही गाडी अत्यंत सोयीची होती. सकाळच्या वेळेत चंद्रपूरला पोहोचण्यासाठी अनेक विद्यार्थी व नोकरदार या गाडीवर अवलंबून होते. मात्र, आता गाडीची वेळ एक तासाने पुढे ढकलण्यात आल्याने त्यांना चंद्रपूरला उशिरा पोहोचावे लागणार आहे. त्यामुळे नियमित प्रवाशांची गैरसोय होण्याची शक्यता असून, या वेळापत्रकाचा फेरविचार करण्याची मागणी होत आहे. रेल्वे प्रशासनाने सुधारित वेळापत्रक आरक्षण व प्रवासी माहिती प्रणालीमध्ये अद्ययावत करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

स्थानकांवरील चौकशी कार्यालयांमध्येही नवीन वेळापत्रकाची माहिती ठळकपणे प्रदर्शित करण्यात येणार आहे. प्रवाशांनी प्रवासापूर्वी गाडीच्या सुधारित वेळेची खात्री करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## भिवापूरात रंगणार भव्य दहीहंडी स्पर्धा

### विजेत्या गोविंदा पथकाला ५१ हजारांचे प्रथम पारितोषिक

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

श्री भीमादेवी क्रीडा व सांस्कृतिक मंडळ आणि भिवापूर युथ फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने 'भव्य दहीहंडी स्पर्धा-२०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी, ६ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता येथील शिवाजी ले-आऊट ग्राउंडवर ही स्पर्धा रंगणार आहे.



स्पर्धेतील विजेत्या गोविंदा पथकाला ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ३१ हजार रुपये, तर तृतीय क्रमांकासाठी ११ हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ५०० रुपये प्रवेश शुल्क ठेवण्यात आले आहे.

दहीहंडीच्या माध्यमातून गोविंदा पथकांच्या कौशल्याला आणि उत्साहाला व्यासपीठ मिळावे, तसेच तरुणांमध्ये सांघिक भावना व क्रीडाभावना निर्माण व्हावी, या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शहर व परिसरातील गोविंदा पथकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी अपूर्व ठवरे, अमोल वारजुरकर, हिमांशू अग्रवाल व निरंजन बिरे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# हजरत बाबा ताजुद्दीन महाविद्यालय में शिक्षक दिवस उत्साहपूर्वक मनाया गया

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

हजरत बाबा ताजुद्दीन कला एवं वाणिज्य महाविद्यालय, ताजाबाद शरीफ, उमरेड रोड, नागपुर में भारत के पूर्व राष्ट्रपति एवं महान शिक्षाविद् डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन की जयंती के उपलक्ष्य में शिक्षक दिवस उत्साहपूर्ण वातावरण में मनाया गया।




कार्यक्रम की शुरूआत संस्था के अध्यक्ष मा. अब्दुल सलीम अब्दुल जब्बार, संस्था के सचिव मा. मोहम्मद शादाब अब्दुल सलीम, संस्था के पदाधिकारियों, महाविद्यालय के प्राचार्य डॉ. अ. शकील अ. सत्तार, प्राध्यापकवर्ग एवं विद्यार्थियों की उपस्थिति में डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन की प्रतिमा पर माल्यार्पण एवं पुष्पांजलि अर्पित कर की गई।

इस अवसर पर विद्यार्थियों द्वारा महाविद्यालय के प्राचार्य एवं प्राध्यापकवर्ग का उत्स्फूर्त स्वागत किया गया। शिक्षक दिवस के अवसर पर आयोजित कार्यक्रम में प्राचार्य डॉ. अ. शकील अ. सत्तार तथा महाविद्यालय के प्राध्यापकों ने अपने विचार व्यक्त करते हुए शिक्षक दिवस का महत्व, शिक्षक की भूमिका तथा विद्यार्थियों के व्यक्तित्व निर्माण में शिक्षकों के योगदान पर मार्गदर्शन किया।

प्राचार्य डॉ. अ. शकील अ. सत्तार ने अपने मार्गदर्शन में कहा कि शिक्षक केवल ज्ञान प्रदान करने वाला व्यक्ति नहीं होता, बल्कि वह विद्यार्थियों के व्यक्तित्व को आकार देने तथा उनके उज्ज्वल भविष्य का मार्गदर्शन करने वाला होता है। बदलती शैक्षणिक परिस्थितियों में शिक्षकों को आधुनिक तकनीक को अपनाकर विद्यार्थियों को गुणवत्तापूर्ण एवं मूल्याधारित शिक्षा प्रदान करने के लिए निरंतर प्रयासरत रहना चाहिए। इस अवसर पर प्राध्यापकों ने भी शिक्षक दिवस के निमित्त अपने विचार व्यक्त किए तथा विद्यार्थियों को शिक्षा के साथ-साथ अनुशासन, संस्कार, मेहनत, ईमानदारी एवं सामाजिक दायित्व जैसे जीवन-मूल्यों का महत्व समझाया। विद्यार्थियों ने शिक्षकों के प्रति कृतज्ञता व्यक्त करते हुए उन्हें शिक्षक दिवस की शुभकामनाएं दीं।

कार्यक्रम में संस्था के अध्यक्ष मा. अब्दुल सलीम अब्दुल जब्बार, सचिव मा. मोहम्मद शादाब अब्दुल सलीम, संस्था के सभी पदाधिकारी, महाविद्यालय के प्राचार्य डॉ. अ. शकील अ. सत्तार, प्रा. डॉ. वीरेंद्र आदमने, डॉ. सुभाष धोटे, प्रा. डॉ. सुरेश काळे, प्रा. डॉ. मीनाक्षी इंगले, प्रा. डॉ. विनोद शेंडे, प्रा. डॉ. नामदेव मोरे, प्रा. डॉ. समीर बडगुजर, प्रा. किरण, प्रा. प्रांजली हाडगे, प्रा. राहुल डेंगे, प्रा. अंकित मेटांगे, प्रा. अर्पित थुल, प्रा. सतीश बोबडे तथा शिक्षकेतर कर्मचारी नंदलाल शर्मा, शादाब खान, कुमेश बिहार, प्रमोद झोडे, मार्तंड गोंडाने, नियाज अली, श्री प्रकाश मेश्राम, गणेश राजपूत एवं विद्यार्थी उपस्थित थे।

कार्यक्रम के सफल आयोजन के लिए प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारियों एवं विद्यार्थियों ने विशेष मेहनत की। सभी के सहयोग से शिक्षक दिवस का कार्यक्रम उत्साहपूर्ण एवं आनंददायी वातावरण में सफलतापूर्वक संपन्न हुआ।

# खापरखेड्यात युवकांवरील जीवघेण्या हल्ला प्रकरणात मकोकाची कारवाई

## ९ आरोपी व ३ विधीसंघर्ष बालकांवर कारवाई, ४ आरोपी अद्यापही फरार

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा-श्रीकांत जालंधर**



खापरखेडा येथील नाग मंदिर चौक परिसरात युवकांवर झालेल्या जीवघेण्या हल्ला प्रकरणात पोलिसांनी कठोर पाऊल उचलत आरोपींविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ अंतर्गत कारवाई केली आहे. तपासादरम्यान समोर आलेली आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि संघटित स्वरूपातील गुन्हेगारी कारवायांमधील सहभाग लक्षात घेऊन ही कारवाई करण्यात आली.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रज्वल प्रदीप जाने (वय १८, रा. खापरखेडा) हा २१ ऑगस्ट २०२६ रोजी त्याचे मित्र हिमांशू कडू, रक्षित कापसे, पुनीत भगत, रोहित मिश्रा व सिद्धांत सातनकर यांच्यासोबत नाग मंदिर चौक परिसरात चहा पीत बसला होता. त्यावेळी सूरज कावले, संघर्ष बागडे, साहिल बागडे, शुभम मोहिते, सुदाम उर्फ चाफाडाहाके व त्यांच्यासोबतचे इतर इसम मोटारसायकल आणि अन्य वाहनांनी तेथे आले.

आरोपीनुसार, सूरज कावले याने धारदार शस्त्राने हिमांशू कडू व रोहित मिश्रा यांच्यावर वार करून त्यांना गंभीर जखमी केले, तर इतरांनी फियार्दी व त्याच्या मित्रांना दांड्याने आणि लाथाबुक्यांनी मारहाण केली. या हल्ल्यात युवकांना ठार मारण्याचा प्रयत्न झाल्याच्या तक्रारीवरून खापरखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासादरम्यान मोहन रोशनसिंग खुरावत, युगांत राजेश सारवे, प्रियांशू विद्याधर रक्षित, हेमंत उर्फ सुदामा मधुकर चाफाडाहाके, जितू रामचंद्र कनोजिया, शांतनु उर्फ दद्दू उर्फ राजेंद्र बागडे, शेख समीर उर्फ बोमट्या, चेतन सतीशराव पाटमासे आणि हर्ष उर्फ आकाश राजेश वर्मा या ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणात ३ विधीसंघर्ष बालकांवरही कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, सूरज कावले, संघर्ष बागडे, साहिल बागडे व शुभम उईके हे अद्याप फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

**गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या आधारे मकोकाची कारवाई**

तपासादरम्यान आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी, संघटित स्वरूपातील कारवायांमधील









सहभाग आणि इतर महत्त्वपूर्ण बाबींचे परीक्षण करण्यात आले. त्यानंतर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मंजुरीने आरोपींविरुद्ध मकोकाच्या संबंधित तरतुदींनुसार कारवाई करण्यात आली.

ही कारवाई पोलीस आयुक्त, नागपूर शहर, सहपोलीस आयुक्त, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्रमांक ६ तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त, कामठी विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली खापरखेडा पोलीस ठाण्यातील अधिकारी व

---

थोडक्यात

## पौष्टिक आहाराचा संदेश देत पाककला स्पर्धा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पोषण सप्ताहाच्या निमित्ताने नंदनवन येथील भाऊसाहेब मुळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या स्वस्थवृत्त व योग विभागातर्फे 'पाककला स्पर्धा २०२६'चे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये संतुलित आहार, पौष्टिक अन्न व निरोगी जीवनशैलीबाबत जनजागृती करणे हा स्पर्धेचा उद्देश होता. स्पर्धेत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमा तील २९ विद्यार्थी तसेच १५ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सहभागींकडून पौष्टिक, चविष्ट व नावीन्यपूर्ण खाद्यपदार्थ सादर करण्यात आले. चव, पौष्टिकता, आकर्षक मांडणी, सर्जनशीलता व आरोग्यदायी घटकांचा वापर या निकषांवर पदार्थांचे परीक्षण करण्यात आले. राज्य पोषण ब्युरो, नागपूरच्या वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी डॉ. रंजना राठोड प्रमुख पाहुण्या व परीक्षक म्हणून उपस्थित होत्या.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. युवराज काळे, डॉ. स्नेहा कुबडे रस शास्त्र विभागप्रमुख डॉ. माधवी रेहपाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. समारोपप्रसंगी प्राचार्य डॉ. युवराज काळे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. पौष्टिक आहारही चविष्ट व आकर्षक असू शकतो, तसेच आयुवेर्दातील आहार संकल्पनेतून निरोगी जीवनशैलीचा संदेश देणे शक्य आहे, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. माधवी रेहपाडे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. ममता तलमले, डॉ. ओमप्रकाश गुल्हाने, डॉ. शरयू गजापूरे, डॉ. रुपाली भनारे व डॉ. स्नेहल भामकर तसेच विभागातील प्राध्यापक, पदव्युत्तर विद्यार्थी व महाविद्यालयातील विविध विभागांनी सहकार्य केले.

## काचुरवाही येथे शिक्षक दिन उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, शुभम कामळे-काचुरवाही**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, काचुरवाही येथे शिक्षक दिनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थिनींनी शिक्षकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कार्यक्रमात कु. रियांशी गोल्हार, कुमारी प्राची नारायणबन्सी, आरोही बावणे व स्वराली यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनकार्याबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन कुमारी सृष्टी वासनिक यांनी केले.

कु. पारटकर मॅडम व कुमारी मंगरुळे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुख्याध्यापिका सौ. काळाने मॅडम यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली. यानंतर दहीहंडीचा कार्यक्रम घेण्यात आला. यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## तालुकास्तरीय कराटे स्पर्धेमध्ये एस.के पोरवाल कॉलेजचे विद्यार्थी जिल्हा स्तरावर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

क्रीडा व युवक संचालनालय पुणे अंतर्गत आयोजित तालुकास्तरीय कराटे स्पर्धा के.जॉन स्कूल, आसोली, भंडारा रोड



नागपूर येथे संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये विविध शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये एस के पोरवाल कॉलेज चा विद्यार्थी यश नागदेवी ५८ तर अंकुश कराडे ५० वजन गटामध्ये खेळून दोघांनीही प्रथम क्रमांक पटकाविले व जिल्हास्तरावर त्यांचे चयन झाले. कॉलेजच्या प्राध्यापिका डॉक्टर मल्लिका नागपुरे यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. त्यांच्या पुढील जिल्हास्तरीय वाटचालीकरिता कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर स्वप्नील दाहात सर तसेच कॉलेजचे उपप्राचार्य व्ही. बी वंजारी व पर्यवेक्षक नरेंद्र मेंढे व कॉलेजचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांच्या पुढील स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

## गणेश मंडळ व शांतता समितीची बैठक संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी,सावनेर उपविभाग, पोलीस निरिक्षक प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन सावनेर यांच्या उपस्थितीत आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळ पदाधिकारी, आयोजक आणि शांतता समिती सदस्य यांची बैठक संपन्न झाली. याप्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी सागर खर्डे यांनी सर्व गणेशोत्सव मंडळांना कायदा व सुव्यवस्थेत गणेशोत्सव साजरा करण्याच्या सुचना दिल्या.

---

## अंतुरकर ले-आऊट मध्ये कृष्णजन्म सोहळा संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर:** नगरसेवक महेश चकोले यांच्या निवासस्थानी श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव साजरा करण्यात आला. ४ सप्टेंबर ला सायंकाळी मुर्तीची स्थापना चंद्रप्रकाश चकोले यांच्या हस्ते करण्यात आले. सायंकाळी गुरुदेव सेवा मंडळ यांची सामुदायिक प्रार्थना,



हरिपाठ,भजन रात्री १२ श्रीकृष्णजन्म आणि पाळणा, आरती करण्यात आले. दुसऱ्या दिवशी सकाळी सामुदायिक ध्यान,आरती दुपारी भजनी गोपाल काला, बालगोपालांनी श्रीकृष्णाच्या बालरुपाचे दर्शन आकर्षक वेशभूषा परिधान करून कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेऊन नुत्य सादर करण्यात आले.

तर माजी सभापती शेषराव चाफले,माजी जिल्हा परिषद सदस्य यांच्या हस्ते दहिहंडीचे पुजन करुन दहिहंडी फोडण्यात आली. उपस्थित पाहुणे व बालगोपालांना कोंढाळीचे नगराध्यक्ष योगेश चाफले यांनी श्रीकृष्णाच्या बालवयातील त्यांनी केलेल्या बालकिरडा उपस्थिताना पटवून दिले. शेवटी आरती,गोपालकाला प्रसाद वितरण करण्यात आले आणि रात्री मुर्तीचे विसर्जन करण्यात आले.कारकम येस्वशी साठी- रमा चकोले,कोमल चकोले,माधुरी मेहर,आशा चकोले, रंजना चकोले, पुष्पा हटवार,किरण चाफले,प्रिती इरुटकर,वैष्णवी मेहर,स्नेहा चकोले यांनी परीश्रम घेतले.तर आभार कोमल चकोले यांनी मानले.

---

## भात पिकावर खोडकिडीचा वाढता प्रादुर्भाव, शेतकऱ्यांची चिंता वाढली!

### पिकाची वाढ खुंटण्याची भीती, अनुदानावर प्रभावी कीटकनाशक उपलब्ध करून देण्याची मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

परिसरातील भात पिकावर खोडकिडीचा प्रादुर्भाव वाढत असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्या भाताचे पीक जोमाने वाढत असले तरी काही शेतांमध्ये खोडकिडीचा प्रादुर्भाव आढळून येत असल्याने आगामी उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

**खोडकिडीमुळे पिकाला धोका**

खोडकिडीची अळी भाताच्या खोडामध्ये शिरून आतील भाग पोखरते. त्यामुळे रोपांची वाढ खुंटणे, पाने वाळणे तसेच पुढील अवस्थेत 'डेड हार्ट' आणि पांढरी कणसे दिसून येण्याची शक्यता असते. प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाल्यास भाताच्या उत्पादनात लक्षणीय घट होण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या भात पिकाची नियमित पाहणी करावी आणि किडीची लक्षणे आढळताच कृषी सहाय्यक किंवा कृषी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे. अंदाजाने किंवा अनावश्यक कीटकनाशकांची फवारणी न करता पिकाची अवस्था व किडीची तीव्रता लक्षात घेऊन शिफारशीनुसारच उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**अनुदानावर कीटकनाशक देण्याची मागणी**

खोडकिडीचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता शासनामार्फत शेतकऱ्यांना अनुदानावर प्रभावी कीटकनाशके उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी पुढे आली आहे. पिकाचे मोठे नुकसान होण्यापूर्वी कृषी विभागाने तातडीने शेतांची पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, तसेच बाधित शेतकऱ्यांना कीटकनाशक खरेदीसाठी आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही शेतकऱ्यांकडून होत आहे.

---

## गुन्हे शाखेकडून सराईत गुन्हेगार शस्त्रासह जेरबंद

### खापरखेडा हद्दीत युनिट-६ ची धडक कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

नागपूर शहर गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक ६ च्या पथकाने खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत धडक कारवाई करत चोरीच्या गुन्ह्यात फरार असलेल्या एका सराईत आरोपीला घातक शस्त्रासह ताब्यात घेतले आहे श्रीकांत उर्फ बंडु गजभिये वय २१ रा. चनकापूर असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार ४ सप्टेंबर शुक्रवारला सायंकाळच्या सुमारास गुन्हे शाखा युनिट०६ चे पथक खापरखेडा परिसरात पेट्रोलिंग करीत होते यादरम्यान चोरीच्या गुन्ह्यातील फरार आरोपी श्रीकांत गजभिये वानखेडे ले-आऊट येथील लोखंडी पत्र्याच्या झोपडीसमोर लपून बसल्याची माहिती खबऱ्याने दिली. माहितीच्या आधारावरून पोलिसांनी सापळा रचून आरोपी श्रीकांत गजभिये याला ताब्यात घेतले यावेळीदोन झडती घेतली असता त्याच्याजवळ लोखंडी मूठ असलेला चाकू आढळून आला पोलिसांनी चाकू घटनास्थळीच जप्त केला.



यावेळी पोलिसानी रेकार्ड तपासला असता आरोपी श्रीकांत गजभिये हा खापरखेडा पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या अपराध क्रमांक ४९९/२०२६ (कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भारतीय न्याय संहिता) या चोरीच्या गंभीर गुन्ह्यात फरार होता.

या प्रकरणी पोलीस अंमलदार सुनिलकुमार यादव यांच्या फिर्यादीवरून खापरखेडा पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ५३७/२०२६ नुसार कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा सहकलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये नवीन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर त्याला पुढील कारवाईसाठी जप्त मुद्देमालासह खापरखेडा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

---

# जर्मन तार चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश, दोघांना अटक

## जलालखेडा पोलिसांची दमदार कामगिरी, ८ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त

## महावितरणच्या वीजखांबांवरून तार चोरल्याचे तपासात उघड; इतर आरोपींचा शोध सुरू

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील विविध भागांत महावितरणच्या लोखंडी खांबांवरील जर्मन कंडक्टर तार चोरी करणाऱ्या दोघांना जलालखेडा पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक केली आहे. पोलिसांनी आरोपींकडून जर्मन कंडक्टर तार, अशोक लेलँड दोस्त पिकअप वाहन आणि रोख रक्कम असा एकूण ८ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरात वीज साहित्य चोरी करणाऱ्या टोळीचे धाबे दणाणले असून, या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.





शुक्रवारी रात्री सुमारास जलालखेडा पोलिसांचे पथक गस्तीवर असताना मोवाड फाट्याजवळ एक वाहन संशयास्पदरीत्या आढळून आले. पोलिसांनी वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला असता चालकाने वाहनासह पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी पाठलाग करून वाहन ताब्यात घेतले. वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात जर्मन कंडक्टर तार आढळून आली.

पोलिसांनी वाहनातील इसमाची कसून चौकशी केली असता त्याने आपले नाव मोहम्मद काशिफ अब्दुल आरिफ शेख (वय २४, रा. पेठ अहमदपूर, ता. आष्टी, जि. वर्धा) असे सांगितले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याचा साथीदार मोहम्मद कैफ अब्दुल आरिफ शेख (वय २४, रा. पेठ अहमदपूर, ता. आष्टी, जि. वर्धा) याचे नाव समोर आले. त्यानंतर पोलिसांनी दुसऱ्या आरोपीलाही ताब्यात घेतले.

तपासादरम्यान चोरी करण्यात आलेली जर्मन कंडक्टर तार ही महावितरणच्या लोखंडी वीजखांबांवर लावण्यात आलेली असल्याचे स्पष्ट झाले. लोखंडी सांबा, खराळा आरंभी, हिवरमठ तसेच उदापूर परिसरातील वीजखांबांवरून तार चोरी केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या चोरीमागे नियोजनबद्ध टोळी कार्यरत आहे का, तसेच चोरीचे साहित्य आणखी कुठे विकण्यात आले आहे का, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे.

या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध कलम ३०३(२) अन्वये चोरीचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी आरोपींकडून जर्मन कंडक्टर तार, अशोक लेलँड दोस्त पिकअप वाहन क्रमांक एमएच-४०-सीडी-५६८१ तसेच रोख रक्कम असा एकूण ८ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के, उपविभागीय पोलीस अधिकारी पराग पोटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद जांभळे यांच्या नेतृत्वात पोलीस कर्मचारी हरिहर सोनोने, आशिष हिरुडकर व दुर्योधन रोहोड यांच्या पथकाने केली.

जलालखेडा पोलिसांनी संशयास्पद वाहनाचा वेळीच पाठलाग करून केलेल्या या कारवाईमुळे वीज साहित्य चोरीच्या घटनांना आळा बसण्यास मोठी मदत होणार आहे. विशेष म्हणजे, चोरीसाठी वापरण्यात आलेले वाहनही पोलिसांनी जप्त केल्याने या प्रकरणातील पुढील तपासाला महत्त्वाची दिशा मिळाली आहे. आरोपींच्या चौकशीतून वीज साहित्य चोरीच्या आणखी घटना उघडकीस येण्याची शक्यता असून, पोलिसांकडून त्या दिशेने तपास सुरू आहे.

# डीजे, फटाके व लेझर लाईटवर निर्बंध, नियमांचे पालन करण्याचे पोलिसांचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

आगामी बैलपोळा, तान्हा पोळा, गणेशोत्सव, हाडपक गणपती उत्सव, नवरात्रोत्सव, शारदा देवी उत्सव तसेच इतर सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर ध्वनीप्रदूषणाला आळा घालणे आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी उमरेड पोलिसांनी उत्सव मंडळे, डीजे व साऊंड सिस्टिम चालक-मालकांची बैठक घेतली. या बैठकीत सर्वोच्च न्यायालय, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण तसेच विविध न्यायालयांनी वेळोवेळी दिलेले आदेश आणि ध्वनीप्रदूषण संदर्भातील नियमांची माहिती देण्यात आली.



नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या वतीनेही आगामी उत्सवांच्या पार्श्वभूमीवर डीजे व साऊंड सिस्टिम चालक-मालकांना नियमांचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत उच्च क्षमतेच्या डॉल्बी साऊंड सिस्टिम, प्लाज्मा साऊंड, प्रेशर मिड साऊंड सिस्टिम तसेच तत्सम ध्वनीप्रणालींच्या वापराबाबत निर्बंध स्पष्ट करण्यात आले आहेत.

**लेझर व बीम लाईटला मनाई**

सार्वजनिक कार्यक्रम व मिरवणुकांमध्ये बीम व लेझर लाईटचा वापर करू नये, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. लेझर किंवा तीव्र प्रकाशामुळे वाहनचालकांच्या दृष्टीवर परिणाम होऊन अपघाताचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे उत्सवाचा आनंद घेताना इतर नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**मॉडिफाइड वाहनांवरही लक्ष**

डीजे व साऊंड सिस्टिम बसविण्यासाठी वाहनांमध्ये अनधिकृत अथवा मॉडिफिकेशन करून केलेले बदल करून उत्सव काळात वाहने वापरू नयेत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधित वाहने मूळ स्थितीत ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**ध्वनीची मर्यादा पाळणे बंधनकारक**

ध्वनीप्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० नुसार निर्धारित ध्वनीमर्यादा तसेच आवश्यक परवानग्यांचे पालन करणे बंधनकारक आहे. उत्सव किंवा मिरवणुकीच्या नावाखाली ध्वनीची मर्यादा ओलांडल्यास नागरिकांना त्रास होण्याबरोबरच कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

ढोल-ताशा पथकांची संख्या, ध्वनीची पातळी, कार्यक्रमाची वेळ आणि इतर बाबींमध्ये संबंधित परवानगी व लागू नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी बैठकीत स्पष्ट केले.

**नियमभंग झाल्यास साहित्य जप्तीची कारवाई**

न्यायालयीन आदेश आणि पोलिस प्रशासनाने जारी केलेल्या निर्देशांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. नियमबाह्य पद्धतीने वापरण्यात येणारे लाऊडस्पीकर, एम्प्लीफायर, साऊंड सिस्टिम व इतर साहित्य जप्त करण्याची कारवाई होऊ शकते. परिस्थितीनुसार लागू कायद्यांनुसार नोटीस देणे



अथवा गुन्हा दाखल करण्याची कारवाईही केली जाऊ शकते.

**उमरेड पोलिसांची मंडळांना सूचना**

उमरेड पोलिस स्टेशनमध्ये झालेल्या बैठकीस विविध उत्सव मंडळांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, डीजे चालक-मालक, काही नगरसेवक तसेच सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी आगामी सर्व सण-उत्सवांमध्ये नियमांचे पालन करून उत्सव साजरे करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

विशेषतः गणेशोत्सव, पोळा, नवरात्रोत्सव व इतर मिरवणुकांच्या वेळी डीजे, साऊंड सिस्टिम, फटाके, लेझर लाईट आणि इतर ध्वनी-विज्ञान उपकरणांचा वापर करताना लागू असलेल्या नियमांची अंमलबजावणी कशी केली जाईल, याबाबत मंडळांना माहिती देण्यात आली.

**उत्सवाचा आनंद राहू द्या; नागरिकांना त्रास नको**

उत्सव हा आनंद, श्रद्धा आणि सामाजिक एकोप्याचा असतो. त्यामुळे एका मंडळाच्या किंवा काही व्यक्तींच्या उत्साहामुळे ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, रुग्ण, लहान मुले अथवा इतर नागरिकांना त्रास होऊ नये, याची प्रत्येकाने काळजी घेणे गरजेचे आहे. नियमांच्या चौकटीत उत्सव साजरा करणे हीच सामाजिक जबाबदारी असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाने काढलेल्या आदेशावरून विविध स्तरांवर चर्चा सुरू असून काही लोकप्रतिनिधींनीही त्यावर आक्षेप नोंदविल्याचे समोर आले आहे. त्यामुळे न्यायालयीन आदेश, प्रशासनाच्या सूचना आणि उत्सव मंडळांच्या मागण्या यामध्ये समतोल राखत उमरेड पोलिसांकडून प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी केली जाते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**सामाजिक सलोखा राखण्याचे आवाहन**

उत्सव साजरे करताना कायद्याचा आदर, ध्वनीप्रदूषणावर नियंत्रण, नागरिकांची सुरक्षितता आणि सामाजिक सलोखा या चारही बाबींना प्राधान्य देणे आवश्यक आहे. नियमांचे पालन करणाऱ्या सामान्य साऊंड सिस्टिमवर सरसकट बंदी नसून निर्धारित ध्वनीमर्यादा व परवानगीच्या अटींचे पालन करणे महत्त्वाचे आहे, अशी भूमिका प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे उत्सव मंडळे, डीजे चालक-मालक आणि नागरिकांनी परस्पर सहकार्य करून उत्सवही साजरा करावा आणि सामाजिक शांतताही जपावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

थोडक्यात

## बोरुजवाडा उड्डाणपुलाजवळ भरधाव कार पलटी, एक गंभीर जखमी

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील नागपूरझभोपाळ मार्गावरील बोरुजवाडा उड्डाणपुलाजवळ भरधाव कार पलटी होऊन अपघात झाल्याची घटना घडली. अपघाताची माहिती सामाजिक कार्यकर्ते



हितेश बनसोड यांना मिळताच त्यांनी तत्काळ उपविभागीय अधिकारी सागर खर्डे यांना माहिती दिली. माहिती मिळताच महामार्ग पोलीस व सावनेर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अपघातातील जखमींना सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांच्या मदतीने तातडीने सावनेर शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.प्राथमिक उपचारानंतर ब्रिजेश ठाकूर (वय ३० वर्षे, रा. कवठा, पाटणसावंगी, जि. नागपूर) यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथे रेफर करण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, MH 48 AC 4641 क्रमांकाची कार भरधाव वेगाने जात असताना चालकाच्या निष्काळजीपणामुळे नियंत्रण सुटून पलटी झाल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच, वाहनाच्या क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहनात बसवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.या अपघाताचा पुढील तपास सावनेर पोलीस करीत आहेत. जखमी मधे प्रीतमचा वारस, पंडाराम, वय ४५ वर्षे. महालकुई तेशह. हिरवा, ४५ वर्षांचा, हरिप्रसाद छोटेलाल उइके वय ४वर्ष रा. पटघरघानिया तह हर्रई., महेश अमनसा उइके वय ३०, श्रीराम पिल्लू उइके वय ३५ वर्षे, रेखा रामेखर उइके, वय २५ वर्ष, रा. खजरवानी ता.हर्रई जि. छिंदवाडा, सशोद जिमप्रकाश विश्वकर्मा वय ३०, शशी बघेल, ब्रिजेश ठाकूर, ह.मु.कवठा ड्रायव्हर गंभीर जखमी असल्याचे सत्र आहे.

## सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार आज मारबतच्या दर्शनाला

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरच्या पारंपारिक व ऐतिहासिक ओळख असणाऱ्या 'मारबत महोत्सवाच्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकाद्वारे आवश्यक



नियोजन व उपाययोजना केल्या जात आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते ६ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता काळी व पिवळी मारबत यांची विधिवत पूजा केली जाणार आहे. नंतर हेरिटेज वॉक देखील आयोजित केली जाणार असल्याची माहिती स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांनी दिली. महापौर निता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात व उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र(बाल्या) बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन यांच्यासह क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड यांच्या देखरेखीत मारबत व बडग्या महोत्सवाची तयारी केल्या जात आहे. नागपूरच्या ऐतिहासिक मारबत महोत्सवासाठी तिकीट अथवा पास आवश्यक असल्याच्या काही पोस्ट सोशल मीडियावर प्रसारित होत असून, त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. याबाबत स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांनी स्पष्ट केले आहे की, मारबत पाहण्यासाठी कोणत्याही प्रकारचे तिकीट किंवा प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही.

मारबत ही नागपूरची १४५ वर्षांची ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा असून, हा वारसा अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचावा, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नागरिकांना या परंपरेची माहिती व्हावी आणि त्यांनी मोठ्या संख्येने मारबत महोत्सवात सहभागी व्हावे, या उद्देशाने मनपाच्या वतीने मारबत महोत्सवांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. शिवानी दाणी वखरे यांनी स्पष्ट केले की, नागपूर महानगरपालिका मारबत पाहण्यासाठी कोणतेही तिकीट विक्री करत नाही. नागरिकांना मारबतच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाशी जोडण्यासाठी मनपाकडून जनजागृती व प्रचार-प्रसार करण्यात येत आहे.

**सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन**

दरम्यान, मारबतच्या निमित्ताने मारबत महोत्सवाचे छायाचित्र/नाव मुद्रित असलेले टी-शर्ट आणि बँड उपलब्ध करून देण्यात आले आहेत. इच्छुक नागरिकांना हे टी-शर्ट व बँड घेता येणार असून, हे पूर्णपणे ऐच्छिक आहे. विशेष म्हणजे,टी-शर्ट अथवा बँड खरेदीचा मारबत पाहण्यासाठीच्या प्रवेशाशी कोणताही संबंध नाही. मारबत महोत्सव हा नागपूरच्या सांस्कृतिक ओळखीचा आणि परंपरेचा महत्त्वपूर्ण भाग आहे. त्यामुळे नागरिकांनी सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या अपुऱ्या किंवा चुकीच्या माहितींवर विश्वास न ठेवता, नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत माध्यमांवर उपलब्ध माहितीलाच प्राधान्य द्यावे, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

## सिंधू मुळीक यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



दिघोरी येथील रहिवाशी सिंधू मुळीक यांचे ५ सप्टेंबर रोजी दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्या ८६ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुलं आणि दोन मुली व बराच मोठा आप्त परिवार आहे. दिघोरी दहन घाटावर अंतिम संस्कार करण्यात आले. त्या पत्रकार रत्नाकर मुळीक यांच्या मातोश्री होत.

## गणपत ढोक यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



नंदू भाऊ व राकेश ढोक यांचे वडील गणपतराव केशवरावजी ढोक यांचे आज दि. ०५ सप्टेंबर रोजी, शनिवारी १ वाजता. दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी- जावई व मोठा आप्तेष्ट परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा रविवार, दि. ०६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता, राहत्या घरून निघणार असून, मानकापूर मोक्ष घाट, मानकापूर चौक, कोराडी रोड, नागपूर येथे अंत्यसंस्कार संपन्न होणार आहेत.

# सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर आमगावात मंथन

### महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी संघटनेचे तिसरे जिल्हा अधिवेशन ७ सप्टेंबरला

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी संघटना, जिल्हा शाखा गोंदियाच्या वतीने तिसरे वार्षिक जिल्हा अधिवेशन तसेच ७५ वर्षावरील सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता शुभमंगलम लॉन, सालेकसा रोड, आमगाव, जि. गोंदिया येथे होणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान खासदार नामदेवजी किरसान भूषविणार असून, उद्घाटक म्हणून आमदार संजयजी पुराम उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाला विविध लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषद पदाधिकारी तसेच संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**विविध प्रलंबित प्रश्नांवर होणार चर्चा**

अधिवेशनाच्या निमित्ताने सेवानिवृत्त कर्मचारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांना वाचा फोडण्यात येणार आहे. जिल्हा व तालुकास्तरावरील मागण्यांमध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या वेतनातून अतिरिक्त वसूल झालेली रक्कम तातडीने परत करणे, आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना निवडश्रेणीचा लाभ व वेतनवाढ देणे, आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करणे, पेन्शन प्रकरणे तातडीने मंजूर करणे आदी मागण्यांचा समावेश आहे. याशिवाय जिल्हा परिषद गोंदियाच्या मुल्यांकन समितीची मंजुरी घेऊन निवडश्रेणीसाठी पात्र सेवाज्येष्ठांची यादी प्रसिद्ध करणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून वसूल केलेली रक्कम परत करणे, आरोग्य सेविकांना कालबद्ध पदोन्नतीचा लाभ देणे तसेच सेवानिवृत्त अंगणवाडी पर्यवेक्षकांच्या प्रलंबित लाभांबाबत कार्यवाही करणे, अशा मागण्याही मांडण्यात आल्या आहेत.

**राज्यस्तरीय मागण्यांनाही मिळणार व्यासपीठ**

संघटनेने राज्यस्तरावरही विविध मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये २००५ पासून सुरू असलेली अंशदायी पेन्शन योजना बंद करून जुनी पेन्शन योजना लागू करणे, निवडश्रेणीचा लाभ प्राथमिक शिक्षकांना माध्यमिक शिक्षकांप्रमाणे देणे, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दरमहा आरोग्य भत्ता देणे, शाळा/सेवास्थळी ऑनलाइन पेन्शन जमा करण्याची सुविधा, अशरांशीकरणाची रक्कम कमी कालावधीत देणे आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना विविध आर्थिक लाभ तातडीने देणे यांसारख्या मागण्यांचा समावेश आहे.

या अधिवेशनात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी यांनी सहभागी होण्याचे आवाहन सेवानिवृत्त संघटनेचे जिल्हाध्यक्ष एल. यू.खोब्रागडे, कोषाध्यक्ष डी.एल.गुप्ता, उपाध्यक्ष डी.बी.चौधरी, एच.पी.पटले, ए.एस.बिसेन, एस. एम.येडे, एल एम खंडाईत, जी.टी.रहांगडाले, डी.टी. गिऱ्हेपुंजे, के. बी.बीसेन, बी.एस. सोनवाने, पी.बी. लांजेवार, टी. आर. वाढीवा, यू.एल बागडे, सी.के. निनावे, बी सी वाघमारे यांनी केले आहे.

## खापरखेड्यात दहशत माजविणाऱ्या टोळीवर बडगा, पाच जण दोन वर्षासाठी तडीपार

### मारामारी, धमकी व गुन्हेगारी पार्श्वभूमीचा विचार, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५५ अंतर्गत कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

खापरखेडा परिसरात मारामारी करून दहशतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या टोळीवर खापरखेडा पोलिसांनी मोठी प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन टोळीतील पाच जणांना दोन वर्षांच्या कालावधीसाठी तडीपार करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री सुमारे ११ वाजताच्या सुमारास मिलन चौक-चणकापूर परिसरातून आकाश सोमर हे आपल्या मित्रांसह मोटारसायकलीने वारेगाव रोडकडे जात होते. यावेळी राज बाबा बारसमोर आरोपींनी त्यांच्याशी वाद घालून मारहाण केल्याचा आरोप आहे. फिर्यादी व त्यांच्या मित्रांना शिवीगाळ करून धमकावण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी खापरखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४८९/२०२६ नोंदविण्यात आला असून, भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

या प्रकरणातील टोळी प्रमुख अक्षय उर्फ डगम पुरुषोत्तम भोसकर (२७) याच्यासह सुमित शेषराव वंजाळ (२८), अनिकेत संध्यसेवक वासनिक (१८), सुनील रामदास वाघधरे (४२) आणि पियुष हिरामण पाल (२०) या पाच जणांविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ५५ अंतर्गत दोन वर्षांसाठी तडीपारीची कारवाई करण्यात आली. संबंधित आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी, त्यांच्याविरुद्ध दाखल असलेले गुन्हे तसेच त्यांच्या हालचालींमुळे भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता विचारात घेऊन ही कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईचा उद्देश आरोपींच्या गुन्हेगारी हालचालींना आळा घालणे आणि परिसरातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हा आहे. ही कारवाई नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखालीखापरखेडा पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदारांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# सालेकसा तहसीलमधील रस्त्यांची दुरवस्था, दुरुस्ती कधी होणार?

### खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका वाढला, नागरिकांकडून रस्ते दुरुस्तीची जोरदार मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

सालेकसा तहसील परिसरातील अनेक गावांमधील रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली असून, मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिकांना वाहतूक करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका कायम असून, प्रशासनाने तातडीने रस्त्यांची दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. सालेकसा तहसील हा आदिवासीबहुल व नक्षलग्रस्त परिसर असून, विकासाची साधने मर्यादित असल्याची नागरिकांची भावना आहे. या भागातील अनेक रस्त्यांची गेल्या १५ ते २० वर्षांपासून दुरवस्था झाल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले आहे. गोवारीटोला-खेडेपार,पानगाव- खेडेपार, पानगाव-पांढरी-पिपरिया, झालिया-धानोली तसेच पिपरिया-सालेकसा या मार्गांची अवस्था विशेषतः खराब झाली आहे. रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डे पडल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

**लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष?**

नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी



निगडित असलेल्या या महत्त्वाच्या प्रश्नाकडे लोकप्रतिनिधी व संबंधित प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. निवडणुकीच्या काळात विकासाची आश्वासने दिली जात असली, तरी प्रत्यक्षात मूलभूत सुविधांची स्थिती सुधारण्याची अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

रस्ते दुरुस्त करा, अपघातांचा धोका टाळा, अशी मागणी आता जोर धरत असून, संबंधित विभागाने पाहणी करून खराब रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

थोडक्यात

## चोरांचा हैदोस, वाडीकरांची झोप उडाली!

'आम्ही सुरक्षित नाही, सुरक्षेची जबाबदारी घ्या साहेब', शेकडो नागरिकांची पोलीस ठाण्यात धडक



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

दत्तवाडी परिसरातील सत्य साई सोसायटी, गजानन प्रसाद सोसायटी, समर्थ गजानन सोसायटी व रामकृष्ण नगर परिसरात चोरट्यांचा सुळसुळाट वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संतप्त शेकडो नागरिकांनी मधुभाऊ मानके पाटील यांच्या नेतृत्वात वाडी पोलीस ठाण्यात धडक देत एसीपी यशवंत नलवडे यांच्या उपस्थितीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. मगर व पोलीस निरीक्षक रामेश्वर दराडे यांच्याकडे सुरक्षेची मागणी केली. १ सप्टेंबर रोजी मध्यरात्री २.४० वाजता विवेक पंचबुध्ये यांची घरासमोर उभी असलेली अल्टो कार चोरट्यांनी लंपास केली. त्यानंतर २ सप्टेंबरला कु. निशा वासनिक यांच्यासह अनेक नागरिकांच्या घरांच्या दरवाजांवर चोरट्यांनी थापा दिल्याने भीती आणखी वाढली आहे.

दिवसा चेहऱ्यावर कापड बांधून अनोळखी व्यक्ती परिसरात फिरताना दिसत असून, दिवसा रेकी आणि रात्री चोरी होत असल्याचा संशय नागरिकांनी व्यक्त केला. अलीकडील चोरीच्या घटनांचा अद्याप छडा लागलेला नसल्याने नागरिकांनी पोलिसांना जाब विचारला. पोलिसांनी रात्रीची गस्त वाढविण्याचे आश्वासन दिले. मात्र, चोरट्यांचा बंदोबस्त होईपर्यंत नागरिकांनी स्वतःही रात्र जागून परिसराच्या सुरक्षेचा निर्णय घेतला आहे. यावेळी वाडी विकास संघर्ष आघाडीचे पदाधिकारी तसेच शेकडो महिला-पुरुष नागरिक उपस्थित होते.

## जुनी पेन्शन योजनेसाठी २६ हजार पेन्शनधारकांचा लढा तीव्र



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त विनाअनुदानित, अंशतः अनुदानित व त्यानंतर १०० टक्के अनुदानवर आलेल्या शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम १९८२ नुसार जुनी पेन्शन योजना लागू करावी, या मागणीसाठी ५ सप्टेंबर २०२६ ला जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर येथे मूक मोर्चा काढून मा. जिल्हाधिकारी साहेब यांना महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय संघाने निवेदन सादर केले आहे.

राज्यातील सुमारे २६ हजार पेन्शनपीडित बांधवांना न्याय मिळावा, अशी संघाची मागणी आहे. २५ सप्टेंबरपर्यंत शासनाने स्पष्ट आदेश काढून जुनी पेन्शन योजना लागू न केल्यास २८ सप्टेंबरपासून आझाद मैदान, मुंबई येथे बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्याचा इशारा संघाने दिला आहे. तसेच २ ऑक्टोबर पासून महात्मा गांधी जयंतीनिमित्त आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीतही जुनी पेन्शन योजनेची मागणी पूर्ण न झाल्यास शिक्षक, कर्मचारी, पदवीधर विद्यार्थी व पालक मतदानातून सरकारचा निषेध करतील, असा इशारा संघाने दिला आहे. शासनाने मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## "साहित्य भारती"च्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची घोषणा

### प्रकाश एदलाबादकर उपाध्यक्षपदी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत 'साहित्य भारती' च्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची घोषणा नुकतीच मुंबई येथे करण्यात आली असून ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक प्रकाश एदलाबादकर यांची महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय विदर्भ प्रांताचे प्रभारी म्हणून त्यांना दायित्व देण्यात आले आहे.महाराष्ट्र प्रदेशाचे अध्यक्ष म्हणून डॉ.बळीराम गायकवाड (मुंबई)यांची निवड झाली असून अन्य तीन उपाध्यक्षांमध्ये डॉ .संजीव गिरासे (धुळे),प्रवीण देशमुख (कल्याण) व रवीन्द्र बेंबरे(देगलूर) यांचा समावेश आहे.



कार्याध्यक्षपदी नंदुरबार येथील शशिकांत घासकडबी यांची नियुक्ती झाली आहे. जळगावचे डॉ. विजय लोहार हे प्रदेश मंत्री असून नाशिकचे डॉ.अरुण ठोके सहमंत्री असतील .संजीव फडके (ठाणे)हे कोषप्रमुख असून वैभव भानुशाली(ठाणे) यांचेकडे प्रदेश कार्यालय आणि व्यवस्थेची जबाबदारी देण्यात आली आहे.याशिवाय प्रचार प्रमुख म्हणून मोहिनी मोडक (अकोला) याना दायित्व देण्यात आले आहे डॉ.सुनीता सांगोले (लातूर)डॉ. पृथ्वीराज तौर(नांदेड )पद्मश्री परशुराम खुणे (गडचिरोली )आणि जयेश मेस्त्री यांचा कार्यकारिणीत समावेश आहे.याशिवाय अभिराम भडकमकर (मुंबई),डॉ.नरेंद्र पाठक, विसुभाऊ बापट, निकिता भागवत (ठाणे) आणि लखनसिंग कटरे (गोंदिया) हे निमंत्रित सभासद आहेत. नितीन केळकर हे महाराष्ट्र प्रदेश संघटन मंत्री असतील.

# ओपीएससह विविध मागण्यांसाठी १२ डिसेंबरला दिल्लीत राष्ट्रीय रॅली

## रामलीला मैदानावर लाखो कर्मचारी सहभागी होणार, देशभरात तयारीला वेग : सुभाष लांबा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**




जुनी पेन्शन योजना (ओपीएस) पूर्ववत करावी, आठवा वेतन आयोग कर्मचारीहिताच्या दृष्टीने लागू करावा, कंत्राटी व मानधन कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण करावे, सरकारी विभागांतील रिक्त पदे भरावीत आणि सार्वजनिक क्षेत्रातील खासगीकरणाला आळा घालावा, या प्रमुख मागण्यांसाठी १२ डिसेंबर रोजी नवी दिल्लीतील रामलीला मैदानावर अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघाच्या वतीने राष्ट्रीय रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीत देशभरातून लाखो कर्मचारी, पेन्शनधारक व कामगार सहभागी होणार असल्याची माहिती महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुभाष लांबा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

एनपीएस व यूपीएस रद्द करून जुनी पेन्शन योजना (ओपीएस) लागू करावी. पीएफआरडीए कायदा रद्द करावा. कंत्राटी, मानधन, आउटसोर्सिंग व रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमित करावे. सरकारी विभाग व सार्वजनिक क्षेत्रातील रिक्त पदे नियमित भरतीने भरावीत. आठवा वेतन आयोग कर्मचारीहिताच्या दृष्टीने लागू करावा. ३.८ फिटमेंट फॅक्टर आणि ५ टक्के वेतनवाढीचा दर लागू करावा. एचआरए ३०, ३५ व ४० टक्के दराने द्यावा. ग्रुप डी कर्मचाऱ्यांसाठी किमान ४० हजार रुपये वेतन निश्चित करावे. दर दहा वर्षांऐवजी दर पाच वर्षांनी वेतन सुधारणा करावी. १८ महिन्यांचा प्रलंबित डीए/डीआर व इतर थकबाकी तातडीने द्यावी. समान काम, समान वेतन, धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करावी. चारही कामगारविरोधी श्रमसंहिता रद्द कराव्यात. सरकारी विभाग व सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे खासगीकरण व निगमीकरण थांबवावे. कर्मचारी व पेन्शन धारकांसाठी कॅशलेस उपचाराची व्यापक आरोग्य विमा योजना लागू करावी.

**वन नेशन, वन पेन्शनची मागणी**

ओपीएस लागू केल्यास अर्थव्यवस्थेवर परिणाम होईल, असा प्रचार केला जात असताना दुसरीकडे कॉर्पोरेट क्षेत्रातील मोठ्या कर्जमाफी व करसवलती दिल्या जात असल्याचा आरोप लांबा यांनी केला. वन नेशन, वन इलेक्शनची चर्चा होते; मग वन नेशन, वन पेन्शन का नाही? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

**देशात लाखो पदे रिक्त**

देशात बेरोजगारी मोठ्या प्रमाणात असताना केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागांसह सार्वजनिक क्षेत्रातील जवळपास एक कोटी पदे रिक्त असल्याचा दावा लांबा यांनी केला. ही पदे तातडीने नियमित भरतीद्वारे भरण्याची मागणी त्यांनी केली. महाराष्ट्रातून मोठा सहभाग १२ डिसेंबरच्या दिल्लीतील राष्ट्रीय रॅलीत महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने कर्मचारी सहभागी होणार असल्याचा निर्धार महाराष्ट्र राज्य कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष अशोक दगडे आणि जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे गोपीचंद कातुरे यांनी व्यक्त केला. रॅलीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील विविध जिल्ह्यांत कर्मचारी परिषदा, गेट मीटिंग, जनजागृती व प्रचार अभियान राबविण्यात येणार आहे. श्रीनगर बैठकीत कृती आराखडा राष्ट्रीय रॅलीच्या तयारीसाठी १२ व १३ सप्टेंबर रोजी श्रीनगर येथे महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक होणार आहे.

या बैठकीत देशभरातील कर्मचारी, पेन्शनधारक व कामगारांना रॅलीत सहभागी करून घेण्यासाठी सविस्तर कृती आराखडा निश्चित करण्यात येणार आहे. पत्रपरिषदेला अशोक दगडे, ज्ञानेश्वर महल्ले, मेघा करारे, मिलिंद धोंगडे, गोपीचंद कातुरे, उत्तम झेंलगुदे, उदय चांदूरकर, पुरुषोत्तम मिलमिले, वासुदेव वाकोडीकर आदी उपस्थित होते. १२ डिसेंबरची दिल्ली रॅली ऐतिहासिक व अभूतपूर्व करण्यासाठी कर्मचारी, पेन्शनधारक, कंत्राटी कर्मचारी आणि कामगारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सुभाष लांबा यांनी केले.पत्रकार परिषदेला उपस्थित सुभाष लांबा, अशोक दगडे, गुरुप्रित सिंग, बुधाजी सुरकार, ज्ञानेश्वर महल्ले, पुरुषोत्तम मिलमिले, गोपीचंद कातुरे आणि वासुदेव वाकोडीकर यांची उपस्थिती होती.

## शिक्षक वडिलांच्या स्मृतींना लेखणीची मानवंदना, ३५० विद्यार्थी व शिक्षकांना पेन भेट

### शिक्षक दिनी आगळावेगळा उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**



शिक्षक दिनाचे औचित्य साधून गडचिरोली येथील जिल्हा परिषद (माध्यमिक शाळा) हायस्कूल तथा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात शनिवारी आगळावेगळा आणि भावनिक उपक्रम पार पडला. आपल्या शिक्षक वडिलांच्या स्मृती जपत त्यांच्या कायार्ला अभिवादन करण्यासाठी शिक्षकांच्या मुलांनी एकत्र येत शाळेतील सुमारे ३५० विद्यार्थी व शिक्षकांना प्रत्येकी तीन पेन भेट दिले. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

गडचिरोली शहरातील जुन्या शैक्षणिक संस्थांपैकी एक असलेल्या या शाळेत शिक्षण घेऊन याच शाळेत शिक्षक म्हणून आदर्श सेवा बजावलेल्या स्व. बी. डी. धकाते, स्व. मनोहरराव कोपुलवार, स्व. संभाजी होकम, स्व. प्रभाकरराव रोटकर आणि स्व. देवराव नगराळे यांच्या मुलांनी शिक्षक दिन आपल्या वडिलांच्या स्मृतींना समर्पित केला.

या आगळ्यावेगळ्या उपक्रमाची संकल्पना शासकीय माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष तथा गव्हर्नमेंट हायस्कूल अमृत महोत्सव समितीचे अध्यक्ष उदय धकाते यांनी मांडली. शिक्षक दिनानिमित्त आपल्या शिक्षक वडिलांच्या स्मृती जपण्यासाठी त्यांच्या मुलांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांना लेखणी भेट देण्याचा उपक्रम राबवावा, असे आवाहन त्यांनी केले. त्याला संबंधित शिक्षकांच्या मुलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत निधी उपलब्ध करून हा उपक्रम प्रत्यक्षात साकारला.

**शाळेच्या इतिहासाचा घेतला आढावा**

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उदय धकाते यांनी जिल्हा परिषद हायस्कूलच्या स्थापनेपासूनचा इतिहास सांगत या शाळेने घडविलेल्या अनेक पिढ्यांचा गौरवपूर्ण प्रवास मांडला. आमचे सर्वांचे वडील याच शाळेत विद्यार्थी म्हणून शिकले आणि पुढे याच शाळेत शिक्षक म्हणून सेवा स्वीकारून असंख्य विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य त्यांनी केले, असे त्यांनी सांगितले.

या शाळेतील अनेक माजी विद्यार्थी आज विविध उच्च पदांवर कार्यरत असून काही माजी विद्यार्थ्यांनी परदेशातही उच्च पदांवर सेवा बजावत शाळेचे नाव मोठे केले आहे, असे सांगत विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेचा आणि गुरुजनांचा अभिमान बाळगावा, असे आवाहन त्यांनी केले.

**पुस्तकी ज्ञानाला पर्याय नाही**

विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञान अधिकाधिक आत्मसात करावे, असा सल्ला देताना धकाते म्हणाले की, सोशल मीडियाचा वापर करताना त्यातून चांगले विचार, ज्ञान आणि सकारात्मक माहिती घ्यावी. गैरसमज पसरविणाऱ्या किंवा चुकीची माहिती देणाऱ्या पोस्ट पुढे पाठविण्याऐवजी त्या डिलीट कराव्यात.

आज कृत्रिम बुद्धिमत्तेचा जमाना आहे. मात्र, अक चा वापर करताना स्वतःची बुद्धी, विचारशक्ती आणि ज्ञान कमी होणार नाही, याची विद्यार्थ्यांनी काळजी घ्यावी. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारावर आपले स्वतःचे ज्ञान नष्ट करू नका; स्वतः विचार करा, वाचा आणि शिकत राहा, असे आवाहनही त्यांनी विद्यार्थ्यांना केले. शिक्षक दिनानिमित्त उपस्थित शिक्षक, विद्यार्थी आणि सर्व माजी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत गुरुजनांनी दिलेल्या ज्ञानाचा आणि संस्कारांचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असेही धकाते यांनी सांगितले. यावेळी माजी विद्यार्थी जितेंद्र मनोहर कोपुलवार, उमेश प्रभाकर रोटकर, विश्राम संभाजी होकम, शोभाताई नगराळे-निरंजने, सुरेखा न्यालेवार-घुमारे, समीर कडीवाल, निलेश दंडवते, सेवानिवृत्त शिक्षक अरुण पोगळे, प्राचार्य एकनाथ टेकाम, सहाय्यक शिक्षक श्री. बेलखोडे आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन प्रा. सपना देशमुख यांनी केले.

## नितीन गडकरी यांच्या हस्ते कॅन्सर तपासणी रुग्णवाहिकेचे लोकार्पण

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपुरातील नागरिकांचे कर्करोगासारख्या गंभीर आजारपूर्वी प्राथमिक निदान व्हावे या उद्देशाने तसेच महिलांच्या निरामय आरोग्यासाठी स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेच्या वतीने कॅन्सर तपासणी रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली. या रुग्णवाहिकेचे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते अलीकडेच लोकार्पण झाले. श्री क्षेत्र कल्याणेश्वर मंदिर महाल येथे स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेद्वारे कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी संग्रामसिंग भोसले महाराज, नगरसेवक श्रीकांत आगलावे, सुबोध आचार्य, बंडू राऊत, कल्याणेश्वर मंदिराचे गुणवंतराव पाटील, अशोक गुप्ता, अतुल मंडलेकर, शिबिर संयोजक डॉ. श्रीरंग वराडपांडे, स्वामी विवेकानंद संस्थेचे जयपाल टाकोटे आदींची उपस्थिती होती. या शिबिरात २०० हून अधिक महिलांनी तपासणी केली असून



या शिबिरात महिलांसाठी गर्भाशय मुख कर्करोग, स्तन कर्करोग, मुख कर्करोग, ट्युमर, आदी कॅन्सरची निःशुल्क प्राथमिक तपासणी करण्यात आली असून विशेष रुपात गरजूसाठी प्राथमिक निदानासहित मेमोग्राफी तपासणी निःशुल्क करण्यात येईल. शिबिरातील निदान झालेल्या व्याधीग्रस्त रुग्णांसाठी स्व. भानुताई गडकरी मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटरद्वारे अत्यल्प दरात एमआरआय, सीटी स्कॅन आणि रक्त तपासणी करण्यात येईल. या उपक्रमासाठी स्वामी विवेकानंद बहुद्देशीय सेवा संस्थेचे जयपाल टाकोटे, डॉ. भारती शरदचंद्र, मंजुश्री चन्ने, अमिषा टाकोटे, राम लाभे, तेजस पाटील आदींचे सहकार्य लाभले. स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेद्वारे पाच वर्षांपासून सुरू असलेल्या मोतियाबिंदू मुक्त नागपूर अभियान अंतर्गत १६७८ आरोग्य शिबिरामध्ये ९ लाख रुग्णांची नेत्र तपासणी, ९८३४५ रुग्णांना चष्मा आणि ५००० हून अधिकचे कॅट्रॅक्ट ऑपरेशन करण्यात आले. तसेच ८०० हून अधिक ज्येष्ठांना कर्णयंत्र वाटप करण्यात आले.

## अपघातात गंभीर जखमी झालेल्या तरुणाच्या पायाची ७ तासांच्या शस्त्रक्रियेत यशस्वी पुनर्रचना

### लता मंगेशकर हॉस्पिटलच्या डॉक्टरांना यश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

एनकेपी साळवे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस आणि लता मंगेशकर हॉस्पिटल, हिंगणा रोड, नागपूर येथील ट्रॉमा युनिटमध्ये करण्यात आलेल्या एका उल्लेखनीय पुनर्रचनात्मक शस्त्रक्रियेमुळे यवतमाळ जिल्ह्यातील दुर्गम भागातील २१ वर्षीय पुन्नेशचा पाय वाचविण्यात डॉक्टरांना यश आले. वेगाने येणाऱ्या ट्रकच्या धडकेत पुन्नेशच्या पायाला गंभीर दुखापत होऊन पाय अक्षरशः चिरडला गेला होता. स्थानिक डॉक्टरांनी पाय कापण्याचा (अँम्प्युटेशन) सल्ला दिल्याने घाबरलेल्या कुटुंबीयांनी पुन्नेशला तातडीने लता मंगेशकर हॉस्पिटलमध्ये दाखल केले.




Figure 1: (A) Pre-op · (B) Intra-op · (C) Intra-op · (D) Day 10

रुग्णालयातील ऑर्थोपेडिक सर्जन, प्लास्टिक सर्जन आणि इंटेन्सिव्हिस्ट यांच्या ट्रॉमा टीमने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पाय कापण्याऐवजी तो वाचविण्याचा निर्णय घेतला. ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. रचित मित्रा यांनी चिरडलेल्या हाडांना स्थिर केले. त्यानंतर मायक्रोव्हॅस्क्युलर प्लास्टिक सर्जन डॉ. समीर महाकाळकर यांनी आधुनिक फ्री टिश्यू ट्रान्सफर तंत्राचा वापर करून



पायाचा गमावलेला भाग पुनर्स्थापित केला.

डॉ. महाकाळकर यांनी सांगितले की, अशा प्रकारच्या जटिल पुनर्रचनात्मक शस्त्रक्रियांसाठी अत्याधुनिक ऑपरेटिव्ह मायक्रोस्कोपची आवश्यकता असते, जो लता मंगेशकर हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहे. ही अत्यंत गुंतागुंतीची आणि नाजूक शस्त्रक्रिया तब्बल ७ तास चालली.



या शस्त्रक्रियेस डॉ. पल्लवी, डॉ. विशेष्ठा आणि डॉ. परिमल यांनी सहकार्य केले. डॉ. रचना नैताम यांनी बधिरीकरण शास्त्राची जबाबदारी सांभाळली. शस्त्रक्रियेनंतर डॉ. राकेश ढोके, इंटेन्सिव्हिस्ट यांनी अतिदक्षता विभागात रुग्णाची आवश्यक काळजी घेतली. डॉ. नितीन देवस्थळे, उपअधिष्ठाता व वैद्यकीय अधीक्षक यांनी शस्त्रक्रियेसाठी आवश्यक प्रशासकीय व लॉजिस्टिक सहकार्य केले.

प्लास्टिक सर्जरी विभागाचे प्रमुख डॉ. जितेंद्र मेहता, ऑर्थोपेडिक्स विभागाचे प्रमुख डॉ. सुशील मानकर आणि भूलशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. केतकी मारोडकर यांनी तरुण डॉक्टरांच्या या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक केले.

व्हीएसपीएमचे उपाध्यक्ष आमदार डॉ. आशिषराव देशमुख आणि एनकेपी साळवे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसचे अधिष्ठाता डॉ. सजल मित्रा यांनी ट्रॉमा टीमचे अभिनंदन केले. अशा प्रकारच्या गुंतागुंतीच्या पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया केवळ विविध तज्ज्ञांच्या समन्वयातून आणि एकत्रित प्रयत्नांतूनच यशस्वी होऊ शकतात, असे त्यांनी अधोरेखित केले.